आर्थिक | राजकीय | सामाजिक घडामोडींचा धांडोळा...

२१ मे २०११ | वर्ष २८ | अंक ४

# शेतकरी संघटक

स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक ₹ १०



मा. माधवराव खंडेराव मोरे अमृतमहोत्सव

## संपूर्ण कर्जमुक्ती शेतकरी

## महामेळावा

दि. १६ मे २०११ पिंपळगाव (बसवंत)

“ शेतकरी वाघ आहे. त्याच्या पाठीवर बसण्याचा प्रयत्न करू नका! – मा. माधवराव खंडेराव मोरे

## महाराष्ट्र राज्य ‘स्वाहाकार’ बँक

### काँग्रेसचा डाव अन् राष्ट्रवादीच्या वर्मी घाव

काँग्रेस आणि राष्ट्रवादीने मिळून राज्य सहकारी बँकेच्या माध्यमातून सहकारी संस्थांना पैसे मिळवले आणि ते बुडवून टाकले. आता सुरू आहे खोटं भांडण.

सहकाराची पवित्र गंगा ग्रामीण भागाच्या विकासासाठी न वापरता शेतकऱ्यांच्या शोषणाचे साधन बनली. ग्रामीण भागातील जनतेला प्रत्येक गोष्टीसाठी सहकारी सोसायटी, जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्या मकडीजालमध्ये फसवून ठेवण्यात आले. त्याने कितीही धडपड केली तरी त्यातून बाहेर पडणे अशक्य!

या विषयी लिहिताहेत ज्ञानेश्वर शेलार, दत्ता जोशी

शेतकरी
# संघटक
स्वातंत्र्याच्या कक्षा रुंदावणाऱ्यांचे पाक्षिक

वर्ष २८ । अंक ४ । २१ मे २०११

**मूल्य : ₹ १०**

संपादक
**सुरेशचंद्र म्हात्रे**

कार्यकारी संपादक
**श्रीकांत उमरीकर**

सहाय्यक संपादक
**ज्ञानेश्वर शेलार**

मुखपृष्ठरचना/अंक मांडणी
**श्रीकांत झाडे**

**वार्षिक वर्गणी : रु. २००/- फक्त.**
(द्वैवार्षिक, त्रैवार्षिक, आजीव आदी प्रकार नसल्यामुळे फक्त वार्षिक वर्गणीच स्वीकारली जाईल.)
वर्गणी **'शेतकरी संघटक'** या नावाने खालील पत्त्यावर पाठवावी.

**(टीप : वर्गणीदारांनी अंकासंबंधी तक्रार असल्यास खालील पत्त्यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.)**
**संपर्क :**
कार्यकारी संपादक, पाक्षिक शेतकरी संघटक,
जनशक्ती वाचक चळवळ,
२४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१,
फोन : ०२४०-२३४१००४.
ईमेल : shetkarisanghatak@gmail.com

● हा अंक मालक मोहन बिहारीलाल परदेशी, संपादक, मुद्रक, प्रकाशक सुरेशचंद्र म्हात्रे यांनी उदय एंटरप्राईजेस, सिडको-औरंगाबाद येथे छापून जनशक्ती वाचक चळवळ, पिनाक, २४४-समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१-३१ येथे प्रकाशित केला. ● अंकाची प्रसिद्धी दर महिन्याच्या ६ व २१ तारखेला. ● अंकातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# अंतरंग

विशेष
**मा. माधवराव खंडेराव मोरे अमृतमहोत्सव वृत्तांत**
शेतकरी संघटक ब्युरो । ३

जागरण
**समाजसेवी संस्थांचे संशयास्पद कार्य**
शेतकरी संघटक ब्युरो । ७

आजकाल
**काँग्रेसचा डाव राष्ट्रवादीच्या वर्मी घाव**
ज्ञानेश्वर शेलार । १०

कॉमन नॉन सेन्स
**पर्यावरणवाद्यांच्या निशाणावर शेतकरी**
सुधाकर जाधव । १३

मधोमध
**महाराष्ट्र राज्य 'स्वाहाकार' बँक**
दत्ता जोशी । १६

मुद्दा
**पेट्रोल दरवाढीचे कटूसत्य**
अजित नरदे । २१

वाङ्मय शेती
**श्याम्याची बिमारी**
गंगाधर मुटे । २३

'भारत' की जुबानी
**सपनों की ताकत**
अॅड. दिनेश शर्मा । २५

(उ)संतवाणी
**आमची नारदीय कीर्तन परंपरा**
'थंडा' महाराज देगलूरकर । २९

**शेतकरी संघटना वृत्त । ३१**

# पश्चिम बंगालातील डावं-उजवं

पश्चिम बंगाल, आसाम, तामिळनाडू, केरळ आणि पाँडेचेरी या पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांचे निकाल १३ मे रोजी जाहीर झाले. निवडणुका पाच राज्यातील असल्या तरी चर्चा मात्र फक्त पश्चिम बंगालभोवतीच फिरत राहिली. जवळपास सर्वांनीच वर्तविलेल्या अंदाजानुसार डाव्या पक्षांची चौतीस वर्षाची राजवट संपुष्टात आली आणि ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेसने ऐतिहासिक विजयाची नोंद केली. असं का व्हावं की ही सगळी चर्चा पश्चिम बंगाल भोवती फिरत राहावी? त्याचं कारण अगदी साधं आहे. कम्युनिस्ट विचारधारेचा लोकशाही मुल्यांवर विश्वास नाही. पन्नासच्या दशकात केरळमध्ये ईएमएस नंबुद्रिपाद यांच्या नेतृत्वाखाली कम्युनिस्ट सरकार सत्तेवर आलं. निवडणुकीद्वारे सत्तेवर आलेलं ते जगातलं पहिलं सरकार. केरळमध्ये डाव्या चळवळीने भारतीय चौकटीत स्वत:ला काही प्रमाणात व्यवस्थित बसवून घेतलं. डाव्या आणि काँग्रेस आघाडीला आलटून पालटून त्या राज्यांत सत्ता मिळत गेली. डाव्या चळवळीतले नेते आणि कार्यकर्तेही केरळपुरता विचार केला तर काहीसे इतर पक्षांप्रमाणेच होते; पण पश्चिमबंगालची मात्र तऱ्हाच वेगळी एकतर तिथे चौतीस वर्षे सत्तांतरच झाले नाही. त्यातही ज्योती बसूंच्या नेतृत्वाखाली जवळपास २४ वर्षांचा कालखंड गेला. एकीकडे लोकशाहीवरती विश्वास नाही आणि दुसरीकडे इतकी वर्षे सलग लोकशाहीद्वारेच सत्ता होती. ही एक मोठी विचित्र गोष्ट पश्चिम बंगालमध्ये घडत होती. पश्चिम बंगालच्या सत्तेच्या आधारावर भारतभर डाव्यांची आणि त्यातही विशेषत: मार्क्सवाद्यांची चलती असायची. अगदी राज्यसभेच्या जागा आणि त्यामुळे पक्षाच्या नेत्यांना, कार्यकर्त्यांना दिल्लीत राहायला फुकटची घरं हे सगळे लाभ पदरात पडायचे. आता पहिल्यांदाच असा प्रश्न निर्माण होतो आहे, की डाव्यांच्या देशभराच्या या सगळ्या पक्ष संघटनेच्या जाळ्याला शक्ती कोण पुरवणार? केरळसह दोन्ही मोठी राज्यं हातातून गेली आहेत. निकालावरची ममता बॅनर्जींची प्रतिक्रिया एक मोठी तिखट होती. पहिल्यांदाच पश्चिम बंगालच्या लोकांना विधानसभेसाठी मतदान करता आलं. कुठलाही हिंसाचार न होता मतदान शांततेत आणि मोठ्या प्रमाणात घडलं. अर्थातच याचं मोठं श्रेय निवडणूक आयोगाला द्यावं लागेल.



पश्चिम बंगालच्या निकालानंतर उत्पन्न झालेल्या एका विचित्र परिस्थितीचा अजून कोणी फारसा विचार केलेला नाही. डाव्यांबद्दल नाराजी होती त्यामुळे त्यांचा पराभव झाला हे ठीक आहे;पण त्यांच्या जागी निवडून आलेल्या ममता बॅनर्जी आणि त्यांच्या तृणमूल काँग्रेसचं काय? यावर विचार व्हायला पाहिजे. ममता बॅनर्जी या उथळ सवंग पद्धतीच्या नेत्या आहेत. आजपर्यंत त्यांची वागणूक विरोधी पक्षाच्या बेजबाबदार नेत्यांसारखी राहिली आहे. केंद्रामध्ये मोठी सत्तापदं उपभोगतानाही त्यांना कधी गांभीर्याचा दाखला देता आला नाही. दूरगामी धोरणं आखण्यासाठी त्या कधीच प्रसिद्ध नव्हत्या. ज्या पद्धतीचा आरडाओरडा त्या संसदेत करतात तितका तर विरोधी पक्षही करत नाही. सगळं रेल्वे बजट बंगालकडे वळवण्याचा कोतेपणा त्यांनी यापूर्वी दाखवलेला आहे. ममता बॅनर्जी यांची धोरणं विकासाला पोषक आहेत का? कर्जबाजारी पश्चिम बंगाल राज्याला ममता बॅनर्जींचं नेतृत्व कितपत दिशा देऊ शकेल हा खरा प्रश्न आहे. बिहारसारख्या राज्याला नितीशकुमार यांच्यासारख्या विकासाची दिशा असलेलं नेतृत्व लाभलं. लगतच्या पश्चिम बंगालमध्ये मात्र कम्युनिस्टांच्या आगीतून निघालो आता ममताच्या फुफाट्यात जाणार की काय? असं जनतेला वाटू नये म्हणजे झालं. जागतिकीकरण, खासगीकरण, उदारीकरण यांच्या नावाने बोटं मोडणे, भांडवलदारांना शिव्या घालणे हे डाव्यांचं आद्यकर्तव्य होतं. उद्या त्यांचीच भाषा ममता बोलू लागल्या, तर पश्चिम बंगालची दिशा अजूनच अंधारात जाणारी असेल हे वेगळं सांगायला नको. १९९१ नंतर जगाच्या बदलत्या परिप्रेक्ष्यात रशियाच्या पतनानंतर आधीच डावी चळवळ निरर्थक ठरली होती. भारतीय पातळीवर पश्चिम बंगालच्या पराभवानंतर अशी स्थिती भारतातल्या या चळवळीला येऊ शकते. खरंतर मूळ प्रश्न असा आहे, पश्चिम बंगालमधील डाव्या चळवळीचे कार्यकर्ते खरंच 'डावे' उरले होते का? सलग मिळालेल्या सत्तेने ज्या पद्धतीची हुकूमशाही पक्ष कार्यकर्त्यांमध्ये दिसून येत होती त्यांना डावं कसं म्हणणार? उपेक्षीत, शोषीत यांची बाजू घेण्यासाठी नेहमी पुढं असणाऱ्या या पक्षाने त्यांचंच शोषण केलं, त्यांनाच मागास ठेवलं असं चित्र पश्चिम बंगालमध्ये सर्वत्र पाहायला मिळतं. आज हा सगळा वर्ग ममतांच्या मागे गेला तो केवळ वैतागाने ममतांबद्दल फार काही ममता आहे. म्हणून लोकांनी निवडून दिलं असं वाटत नाही. उलट आता ममतांची ही जबाबदारी आहे की त्यांनी डाव्यांच्या पारंपरिक विचारसरणीप्रमाणे विचार न करता नवीन काळाला सुयोग्य असा नवा विचार करायला पाहिजे, यातून पश्चिम बंगालला योग्य दिशा मिळू शकेल. डाव्यांच्या राजवटीत शेवटच्या काही वर्षांमध्ये कलाक्षेत्राची प्रचंड प्रमाणात अवनती झाली. सगळ्या भारताला इतकंच नव्हे तर जगाला चित्रपट, संगीत, साहित्य आदींचे नवे आयाम देणारा पश्चिम बंगाल गेल्या दहा वर्षांत या क्षेत्रात कितीतरी मागे गेलेला आढळतो. बादल सरकार या गुणी प्रतिभावंत नाटककाराचा मृत्यू या निकालाच्या दरम्यानच व्हावा हाही एक वेगळाच योगायोग. आता ममतांची ही जबाबदारी आहे, टागोरांच्या दीडशेव्या जयंतीच्या पार्श्वभूमीवर पश्चिम बंगालमध्ये साहित्य, संगीत, कलेसाठी पोषक वातावरण निर्माण व्हावं. ममता बॅनर्जी या बेभरवशाच्या नेत्या आहेत. त्यांच्या नेतृत्वाची खरी कसोटी आता लागणार आहे.

# मा. माधवराव खंडेराव मोरे अमृतमहोत्सव

# संपूर्ण कर्जमुक्ती शेतकरी महामेळावा

दि. १६ मे २०११ पिंपळगाव (बसवंत)

**पिंपळगाव बसवंत दि. १६ मे :** येथील प्रमिला लॉन्स मध्ये दुपारी एक वाजता शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते मा. श्री. माधवराव खंडेराव मोरे (नाना) यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त संपूर्ण कर्जमुक्ती शेतकरी महामेळावा घेण्यात आला. कार्यक्रमाला राज्यभरातून शेतकरी, शेतकरी महिला आणि शेतकरी संघटना, महिला आघाडी, युवा आघाडी तसेच स्वतंत्र भारत पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शेतकरी हुतात्मे आणि उत्तर प्रदेशातील शेतकरी नेते महेंद्रसिंग टिकैत यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

या प्रसंगी माधवराव मोरे यांना नाशिक जिल्हा शेतकरी संघटनेच्या वतीने सन्मानपत्र देऊन सपत्नीक सत्कार करण्यात आला. शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष ज्येष्ठ नेते मा. भास्करभाऊ बोरावके, रामचंद्र बापू पाटील, जयपालअण्णा फराटे यांच्याहस्ते हा सत्कार करण्यात आला.

शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते ज्यांनी सुरुवातीच्या काळात शरद जोशींच्या खांद्याला खांदा लावून संघटनेचा झंझावात देशभर पोचवला असे मा. श्री. माधवराव ऊर्फ नाना खंडेराव मोरे त्यांच्या अमृतमहोत्सवानिमित्त बसवंत पिंपळगाव येथे झालेल्या कार्यक्रमात



बोलत होते. या कार्यक्रमासाठी राज्यभरातून आलेल्या शेतकऱ्यांना मार्गदर्शन करताना आजही त्यांची शब्दांची धार, खणखणीतपणा व शेतकऱ्याच्या काळजाला हात घालणारे आर्जव तसेच होते.

यावेळी मा. माधवराव मोरे यांचा अमृतमहोत्सवी सत्कार, शेतकरी संघटनेच्या पुढील आंदोलनाची दिशा, तसेच संपूर्ण कर्जमुक्ती टप्पा क्र. ३ चा निर्णय आणि मार्गदर्शन करण्यात आले.

**मा. माधवराव खंडेराव मोरे :** ''शेतकऱ्यांनी काळानुसार बदलले पाहिजे आणि आपल्या लढाईची शस्त्रेही बदलावी लागतील. शेतकऱ्यांची चूल अजूनही पेटती आहे. त्यातील विस्तवावर फक्त फुंकर घालण्याची गरज आहे. त्याच्या अंगाला हात लावण्याची कुणाचीही हिंमत नाही. शेतकरी वाघ आहे. त्याच्या पाठीवर बसण्याची कुणीही हिंमत करू नका!''

सेझबद्दल बोलताना त्यांनी, ''आपल्या जमिनी पैसे मिळत आहेत म्हणून विकू नका. पैसे घेऊन काय करणार? हेही ठरवा! उद्योगांमध्ये भागीदारी मिळवा. जमिनीचा दर स्वतः ठरवा,'' असा मोलाचा सल्लाही त्यांनी शेतकऱ्यांना दिला. जागतिकीकरण ही मोठी संधी असली तरी तिचा फायदा कंपन्यांचे दलाल म्हणून आलेले आणि खरेदी विक्रीचे व्यवहार करणारे राजकारणी अशा कोल्ह्या-कुत्र्यांना खाऊ देऊ नका. शेतीच्या बांधापर्यंत जागतिकीकरण नेले तरच त्याचा आपल्याला फायदा होईल. तीस वर्षांपूर्वी आपण आंदोलन सुरू केले तेव्हा आपल्याला महाराष्ट्र सरकारशी आणि केंद्र सरकारशी लढाई करायची होती. आता संपूर्ण जगाशी दोन हात करायचे आहेत. शेतकऱ्यांनी नवीन तंत्रज्ञान आत्मसात केल्याशिवाय जगाशी दोन हात करणे शक्य होणार नाही,'' असेही त्यांनी आपल्या



मनोगतात व्यक्त केले.

कुठल्याही सभेमध्ये वक्ते विरोधी पक्षाला, सत्ताधारी पक्षाला शिव्यांची लाखोली वाहतात. मात्र समोर बसलेल्या शेतकऱ्यांनाच त्यांच्या दारिद्र्याची जाणीव करून देतानाच आपल्या भाषणातून शेलक्या शिव्या देणारे आणि त्यांची वाहवा आणि टाळ्या मिळविणारे भाषण अजून चालू द्या. असे म्हणायला लावणारे एकमेव वक्ते म्हणजे माधवराव मोरे होय. कोणत्याही सभेत वक्ता आपल्या भाषणात श्रोत्यांच्या विरोधात बोलत नव्हता. नानांचे तंत्र मात्र उलटे होते. आपल्या भाषणातून ते उपस्थित शेतकऱ्यांवरच असूड ओढायचे. जाहीर सभेतच ते शरद जोशींनाही प्रश्न विचारायचे- ''समोर बसलेल्या लाचारांचे नेतृत्व तुम्ही करणार आहात काय? ज्यांना स्वतःच्या अस्तित्वाचा विसर पडला आहे. साहेब तुम्ही त्यांच्या नादी लागू नका. हे इथं भाषणं ऐकतील, टाळ्या वाजवतील आणि उद्या पुन्हा कुठेतरी एखाद्या पुढाऱ्याच्या पाठीमागे फिरताना दिसतील. त्यांच्यासाठी धोतराचा सोगा सुटेपर्यंत हारतुरे घेऊन पळतील. यांच्या नादी लागू नका.'' अशा शब्दांत नानांनी सुनावले तरी आपल्या लाचारीचे वर्णन ऐकून शेतकरी हजारोंच्या आणि लाखोंच्या संख्येने शेतकरी संघटनेच्या आंदोलनात सामील झाले, त्याचे कारण नानांचे शेतकऱ्यांच्या जिव्हारी लागणारे शब्द आणि त्यातून त्यांना झालेली त्यांच्या ताकतीची जाणीव हेच होते. नानांचे शेतकरी संघटनेच्या परभणी अधिवेशनातील भाषण तर फारच गाजले. अधिवेशन संपताना लोकांनी रांगा लावून भाषणाच्या कॅसेट्स विकत घेतल्या. आता सध्या जे लोक शेतकरी संघटनेसाठी लढायला तयार आहेत त्यांनी त्यांच्या तरुण वयात हे भाषण ऐकले आणि संघटनेचा लाल बिल्ला छातीवर लावून लढायला तयार झाले, असे सर्वच कार्यकर्ते स्वतःला आजही अभिमानाने आम्ही 'परभणी पागल' आहोत असे म्हणतात. ही भाषाही त्यांना नानांनीच शिकवली. त्यांच्या भाषणात ग्रामीण बोलीभाषा आणि शेतकऱ्यांच्या भावनांना हात घालण्याची विलक्षण हातोटी आहे. श्रोत्यांनाच अगदी आपण त्यांच्यासमोर गप्पा मारतो आहोत अशा पद्धतीने अरे कारे करत प्रश्न विचारीत त्यांचे भाषण चालते. त्यामुळेच त्यांची आणि श्रोत्यांची नाळ जुळते. 'अरे आपल्या बाया संडासला बसण्यासाठी कुपाटीला जातात मोटारसायकल किंवा गाडी आली की लज्जा रक्षणासाठी उठून उभ्या राहतात. याच्यापेक्षा आणखी मोठी बेइज्जती आपली कोणती होणार आहे. असे शेतकऱ्यांना विचारल्यावर त्यांच्या डोळ्यांसमोर वास्तव उभे राहायचे. तीन दांडाचं लुगडं आणि आंग उघडं असे म्हटल्यावर शेतकऱ्याच्या डोळ्यासमोर आपली आई, बहीण किंवा बायको मूर्तीमंत उभी राहत असे. शेतकऱ्याच्या कर्जबाजारीपणाचे वर्णन करताना नाना आपल्या भाषणात- शेतकऱ्याची टोपी एका बँकेची, सदरा एका बँकेचा, तर धोतर एका बँकेचे ही परिस्थिती आहे, असे सांगायचे. सुरुवातीच्या काळात कुठल्याही सभेला प्रल्हाद पाटील कराड यांनी शेतीच्या वास्तवाचे वर्णन करावे, नानांनी शेतकऱ्याच्या घरच्या दारिद्र्याची त्याला जाणीव करून द्यावी आणि मग शरद जोशींनी शेतीचे अवघड अर्थशास्त्र अशा मशागत केलेल्या शेतकऱ्यांच्या मनावर आपल्या सोप्या भाषेत उमटवावी, अशी त्रिमूर्ती झंझावाताप्रमाणे महाराष्ट्रभर फिरली आणि एका लढवय्या संघटनेचा जन्म झाला, ती म्हणजेच शेतकरी संघटना.

**मा. रामचंद्र बापू पाटील :** शेतकरी संघटनेचे माजी अध्यक्ष रामचंद्र बापू पाटील यांनी बोलताना- ''नानांनी कधीही आयुष्यात हार मानली नाही. हुजरेगिरी केली नाही. त्यामुळेच त्यांनी कधी निवडणूकही लढवली नाही. शेतकरी संघटनेची मुलूखमैदान तोफ हीच त्यांची ओळख आहे,'' असे आपल्या



भाषणात सांगितले.

**मा. सुरेशचंद्र म्हात्रे :** आपल्या अत्यंत सोप्या आणि गावरान भाषेत नानांनी शेतकऱ्यांना शेतीमालाच्या भावाचे अर्थशास्त्र आणि त्यांच्या दारिद्र्याची जाणीव करून दिली, हे सगळ्या महाराष्ट्राला माहीत आहे. त्यांना हीच गोष्ट कधी कधी अर्थतज्ज्ञांनासुद्धा शिकवावी लागे आणि त्यांनी ती शिकवली. पुण्यामध्ये शरद जोशी, माधवराव आणि वि. म. दांडेकर यांची चर्चा चालू असताना माधवरावांनी दांडेकरांना एकच प्रश्न विचारला, 'तुम्ही एवढी सगळी आकडेवारी आणि अर्थशास्त्राचे सिद्धांत सांगता... मला फक्त एवढेच सांगा, आमच्या आयाबाया सकाळी उठल्यावर उजाडायच्या अगोदर कुपाटीला जातात... त्यांच्यासाठी प्रत्येक शेतकरी आपल्या घरी शौचालय बांधू शकेल असे काही अर्थशास्त्र तुमच्याकडे आहे का? ते मला सांगा.' असे म्हणून ग्रामीण दारिद्र्याचे आणि त्यावरील उपायांचे चित्रणच दांडेकरांसमोर त्यांनी उभे केले.

**ॲड. अनंत उमरीकर :** संपूर्ण कर्जमुक्ती आंदोलनाचा तिसरा टप्पा नानांच्या अमृतमहोत्सवी कार्यक्रमापासून आपण सुरू करीत आहोत. हा टप्पा अतिशय सोपा असून प्रत्येक शेतकऱ्याने तीन फॉर्म भरून द्यायचे आहेत. (शेतकरी संघटकच्या पूर्वीच्या अंकांत प्रसिद्ध झाले आहेत.) हे सर्व फॉर्म प्रत्येक तालुकाध्यक्षाकडे जमा करायचे आहेत. नंतर जिल्हाप्रमुख आणि पुढे संपूर्ण राज्याचे फॉर्म एकत्र करून ते अनुक्रमे मा. पंतप्रधान, मा. सरन्यायाधीश (सर्वोच्च न्यायालय) आणि मा. गव्हर्नर (रिझर्व्ह बॅंक) यांना पाठवायचे आहेत. लाखोंच्या संख्येने हे फॉर्म शेतकऱ्यांनी जमा करावेत. संपूर्ण भारतातला शेतकरी आणि त्याच्यावरील कर्जे ही अनैतिक आहेत. आपण कर्जमुक्ती मागतो म्हणजे काही पाप करतो असे नाही, तर सरकार शेतकऱ्याला शेतीमालाचा भाव मिळू देत नाही म्हणून तो कर्ज फेडू शकत नाही,'' असे त्यांनी सांगितले.

**प्रा. इंद्रजित भालेराव :** मा. माधवराव मोरे यांच्यासारख्या बुलंद व्यक्तिमत्वाच्या माणसाचे दर्शन घेण्यासाठी मी आलो आहे. आजपर्यंत शेतकरी संघटनेच्या विविध कार्यक्रमांतून मी माझ्या कविता सादर केल्या आहेत. माधवराव मोरे यांच्या पंचाहत्तरीनिमित्त मी सदिच्छा चिंतीतो आणि माझी नेहमी म्हटल्या जाणाऱ्या कविता म्हणून दाखवतो,' असे म्हणून त्यांनी आपल्या 'शिक बाबा शिक लढायला शिक' आणि 'माझा बाप शेतकरी' या कविता जमलेल्या कार्यकर्त्यांना ठेका धरायला लावून म्हटल्या.

**मा. सौ. सरोजताई काशीकर :** मा. माधवराव मोरे सामान्यांतील असामान्य व्यक्तीमत्त्व आहे. त्यांच्या कैक आठवणी आम्हाला प्रेरणा देत असतात. शेतकऱ्याच्या घरात किती दारिद्र्य आहे याची जाणीव नाना आपल्या भाषणातून करून देत. शेतकरी आपल्या घरातील स्त्रियांसाठी साधे शौचालयसुद्धा बांधू शकत नाही. याची खंत शेतकऱ्यांसमोर जेव्हा ते मांडीत तेव्हा शेतकऱ्यांना आपल्या दारिद्र्याची जाणीव होत असे. आपण शेतात एवढे कष्ट करूनही अगदी साध्या साध्या गोष्टी आपल्या मुलाबाळांना आणि कुटुंबाला का देऊ शकत नाही हा प्रश्न त्याच्या मनात उभा राहिला की तो आंदोलनासाठी पेटून उठे, असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले.

**मा. खा. हरिश्चंद्र चव्हाण :** आदरणीय माधवराव मोरे यांच्यासारखे बुलंद व्यक्तिमत्व आम्हालाही प्रेरणादायक आहे. त्यांनी सुरुवातीला कांदा आंदोलनाच्या वेळी तत्कालिन खासदार नाशिकहून जात असतानाही शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकायला थांबत नाहीत असे पाहून त्यांची गाडी अडवली आणि शेतकऱ्यांचे गाऱ्हाणे मांडण्याचा प्रयत्न केला; परंतु नानांचा संताप अनावर झाला आणि लोकप्रतिनिधी



एवढे उदासिन असतात याचा राग येऊन खासदाराच्या श्रीमुखात भडकावून दिली. लोकप्रतिनिधींनासुद्धा अशाप्रकारे कुणीतरी जाब विचारणे गरजेचे आहे. आम्हीसुद्धा काही चुकत असल्यास नानांनी आमचा कान धरावा, आमच्या कामाची आणि कार्याची दिशा चुकत असेल तर त्यांनी आम्हाला वेळोवेळी अवश्य मार्गदर्शन करावे.''

**मा. अनिलदादा घनवट :** आम्ही शेतकरी संघटनेत आलो ते केवळ नानांच्या जहाल व्यक्तव्याचा आणि शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची आम्हाला जाणीव करून दिल्यामुळेच नसता आम्हीही तालुका पातळीवर कुठल्यातरी पुढाऱ्यांचे पाय चाटीत बसलो असतो. आज आम्ही शेतकऱ्यांसाठी लढतो आहोत आणि नानांचे कार्य बलदंडपणे पुढे चालवित आहोत. याचा आम्हाला अभिमान आहे. नानांनी त्या काळात ज्या प्रखर आंदोलनांची सुरुवात केली. ते निखारे आम्ही तसेच जपून ठेवले आहेत आणि कुठल्याही आंदोलनासाठी आम्ही तयार आहोत.

**मा. आ. वामनराव चटप :** आता इथे खासदार हरिश्चंद्र चव्हाण व निफाडचे आमदार अनिलअण्णा कदम बोलले. ते दोघेही विरोधी पक्षांचे. त्यांचा आपल्याला काय उपयोग साखरेच्या निर्यातीला जानेवारीपर्यंत परवानगी द्या, जागतिक बाजारपेठेत त्यावेळी साखरेला भाव होते. आता साखर निर्यात करा म्हणतात. त्याचा काय उपयोग? आता आंतरराष्ट्रीय बाजारातील साखरेचे भाव पडलेले आहेत. कापसाच्या निर्यातीला परवानगी द्या म्हणून आपण हंगामाच्या सुरुवातीलाच आंदोलन केल्यामुळे यावर्षी कापसाला कधी नव्हे एवढा चांगला भाव मिळाला. सध्या कापसाचे भाव अर्ध्यावर आले आहेत; पण निर्यातबंदी उठवा अशी कोणीही लोकप्रतिनिधी म्हणतात का? कर्जमाफी केली असे पुढारी म्हणतायेत. त्यांनी त्यांच्याच बँकांतील तोटा कर्जमाफीच्या पैशांनी भरून काढला. कर्जमुक्ती तर अजून व्हायची आहे. आजपासूनच कर्जमुक्तीच्या तिसऱ्या टप्प्याची सुरुवात नानांच्या साक्षीने आम्ही करीत आहोत. संपूर्ण कर्जमुक्ती झाल्याशिवाय आम्ही आता थांबणार नाहीत.

**मा. रवि देवांग :** 'आता एकच नारा सातबारा कोरा' हा आपला कार्यक्रम आहे. संपूर्ण कर्जमुक्तीचे फॉर्म जून महिन्यात वाटले जातील. भरलेले फॉर्म थेट सरकारकडे पाठवले जातील. शेतकऱ्यांचे कर्ज कसे अनैतिक आहे. यासाठी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले जातील. साखर निर्यातीला आणि कापूस निर्यातीला ताबडतोब परवानगी द्यावी. उसाचे पहिले पेमेंट १८०० रुपये प्रति टन ताबडतोब कारखान्यांनी अदा करावेत. साखरेचे दर कोसळल्याने कारखाने ठरलेला भाव देण्यास टाळाटाळ करीत आहेत. राजकारण्यांचेच कारखाने असल्यामुळे केंद्र सरकारशी दोन हात करण्याची त्यांची तयारी नाही. शेतकऱ्यांची मात्र फरपट होणार आहे. अतिरिक्त उसाचा प्रश्नही भेडसावतो आहे. संपूर्ण उसाचे गाळप केल्याशिवाय एकही कारखाना बंद करू दिला जाणार नाही.

या मेळाव्यात मंचावर भास्करभाऊ बोरावके, जयपालअण्णा फराटे, तुकाराम पाटील निरगुडे, रवि देवांग, वामनराव चटप, सुरेशचंद्र म्हात्रे, मालोजीराव मोगल, गुणवंत पाटील हंगरगेकर, प्रकाशसिंह पाटील, सौ. सरोजताई काशीकर, सौ. जयश्रीताई पाटील, डॉ. निर्मला जगझाप, कैलास तवार, ॲड. अनंत उमरीकर, भास्करराव बनकर, डॉ. कदम, पुरुषोत्तम लाहोटी, शशिकांत भदाणे सर, खा. हरिश्चंद्र चव्हाण, आ. अनिलअण्णा कदम, इंद्रजित भालेराव, सौ. स्मिता गुरव, अर्जुन तात्या बोराडे, देविदास पवार, सुरेश माने, माणिकराव बोरस्ते, नानासाहेब बोरस्ते, राजेंद्र मोगल, राजेंद्र डोखळे, भास्करराव मोरे, दिलीप मोरे, विश्वास मोरे, प्रतापदादा मोरे, संतु पाटील झांबरे, विष्णुपंत मोरे, शंकरराव पूरकर, विष्णूपंत ताकाटे, केदुची बोराडे, संतू बोराडे, भीमाजी कोटकर, सोपान संधान, जगदीश बोंडे, प्रा. रविंद्र मोरे, अरुण मोरे इत्यादी मोरे उपस्थित होते.

अमृतमहोत्सव सोहळा यशस्वीतेसाठी विश्वास माधवराव मोरे, विश्वास बापूराव मोरे, सतीश मोरे, दिलीपराव देशमाने, पुंडलीक गायकवाड, गणेश मोरे इत्यादींनी प्रयत्न केले.

**शेतकरी संघटक ब्युरो**

■■

# समाजसेवी संस्थांचे संशयास्पद कार्य

**ज्या स्वार्थापोटी राजकारणी मंडळी आपल्या मुलाबाळांना राजकारणात पुढे आणत आपली घराणेशाही चालवतात तसल्याच कारणांसाठी काही समाजसेवी मंडळी आपल्या संस्थांचा कारभार आपल्या पोरबाळांकडे सोपवत असावेत अशी शंका घ्यायला जागा आहे. असल्या समाजसेवी संस्थांचा कारभार, त्यांच्याकडे येणाऱ्या आर्थिक मदतीच्या ओघाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केल्यास बरीच धक्कादायक माहिती हाती लागू शकते; पण सरकारच्या अपारदर्शक कार्यपद्धतीच्या नावे बोटे मोडणाऱ्या या समाजसेवी संस्था स्वत:चा कारभार मात्र जनतेपासून लपवून ठेवतात. त्यांचे वरवरचे हेतू दिसण्यास वेगळे असले तरी अंत:स्थ हेतू काय असावेत याची स्पष्ट कल्पना कोणाही सुजाण व्यक्तीस येऊ शकते.**

मेधा पाटकर नेहमीच वाद-विवादाच्या शेजारी असतात किंवा आपण असे म्हणू शकतो की वादग्रस्त मुद्दे नेहमी त्यांना शोधत असतात. 'सम्राट अशोक नांदेडवाले' यांचा वादग्रस्त 'आदर्श' पाडण्याची मागणी असो वा नर्मदा बचाव आंदोलन, मेधा पाटकर अग्रभागी राहून निदर्शने करतात. नुकतेच त्यांचे नाव पुन्हा एकदा चर्चेत आले. या वेळेसचे कारण जरा वेगळे होते. चुकीची माहिती देऊन न्यायालयाची दिशाभूल केली म्हणून सर्वोच्च न्यायालयाने त्यांना फटकारल्यामुळे त्या पुन्हा चर्चेत आल्या.

त्याचे झाले असे, की नर्मदेवरील सरदार सरोवर धरणाला मेधा पाटकर यांनी नर्मदा बचाव आंदोलनाच्या माध्यमातून विरोध केलेला आहे. फेब्रुवारी २०१० मध्ये त्यांनी सर्वोच्च न्यायालयात एक जनहित याचका दाखल करून मध्यप्रदेश सरकारने जवळपास ३ लाख हेक्टर शेतजमीन ताब्यात घेतल्याचा आरोप करून ती मूळ मालकांना परत देण्यात यावी अशी मागणी केली. आता ३ लाख हेक्टर म्हणजे काही थोडी जमीन नाही. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला आपली बाजू मांडण्यास सांगितले. पाटकरांनी न्यायालयाला खोटी माहिती पुरविल्याचे राज्य सरकारने सांगितल्यावर न्यायालयाने इंदोरच्या जिल्हा न्यायाधीशांना या प्रकरणाची चौकशी करण्यास सांगितले. त्यांनी चौकशी केली असता त्यांना असे आढळून आले की पाटकरांनी आपल्या जनहित याचिकेत केलेले आरोप खोटे आहेत. राज्य सरकारने सदर जमीन आपल्या ताब्यात घेतलेली नाही त्यावर मूळ मालक शेती करत आहेत. हा चौकशी अहवाल पाहून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री. पांचाळ यांनी पाटकर आणि त्यांचे नर्मदा बचाव आंदोलन यांना खोटी माहिती पुरविली म्हणून कडक शब्दांत सुनावले. तसे करणे म्हणजे फौजदारी स्वरूपाचा गुन्हा असल्याचे सांगून तुम्हास देशातल्या कोणत्याही न्यायालयात जनहित याचिका दाखल करण्यास कायम बंदी का घालू नये? असा प्रश्न केला.

इथे लक्षात घेण्यासारखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपले घरदार सोडून तळागाळातल्या लोकांसाठी काम करणाऱ्या मेधा पाटकरांनी सर्वोच्च न्यायालयास खोटी माहिती पुरविण्याचे कारण काय? याचे उत्तर शोधण्यास आपण गेलो तर काही वेगळेच चित्र समोर उभे राहते. नर्मदा बचाव आंदोलनात सुरुवातीपासून सहभागी असणाऱ्या बडोद्याच्या एका संस्थेचे प्रमुख कार्यकर्ते अंबरिश मेहता यांचा अनुभव बोलका आहे. त्यांची संस्था आणि नर्मदा बचाव सोबतच धरणामुळे विस्थापित होणाऱ्या आदिवासींच्या पुनर्वसनासाठी लढत होते. अर्थात विविध प्रकल्पांमुळे विस्थापित होणाऱ्या जनतेच्या पुनर्वसनाचे काम कोणत्याच सरकारने समाधानकारकरीत्या केलेले नाही हे सत्य आहे. म्हणून समाजसेवी संस्था सरकारवर दबाव आणून ते करून घेण्याचा प्रयत्न करतात. मेधा पाटकरांनी सरदार सरोवर प्रकल्पाला विरोध करताना विस्थापितांचे पुनर्वसन आणि पर्यावरणाची हानी हे दोन मुद्दे प्रामुख्याने समोर आणले होते. जेव्हा राज्यसरकारने पुनर्वसनासाठी समाधानकारक प्रस्ताव पुढे आणला तेव्हा इतर आंदोलनकर्त्या संघटनांनी तो स्वीकारला; पण मेधा पाटकर मात्र त्याच्या विरोधात गेल्या. सरकारच्या प्रस्तावात त्यांच्या सर्व आक्षेपांचे उत्तर होते तरीही त्यांनी आडमुठी भूमिका स्वीकारून त्यास विरोध केला आणि त्यावरही अतिरेक करत मुळात मोठी धरणे



हवीतच कशाला असा प्रश्न उपस्थित करून उरबडवून आक्रोश करायला सुरुवात केली. त्यांना साथ होती अरुंधती रॉय, बाबा आमटे यांची. जगात सध्या पर्यावरण या शब्दाची चलती आहे; अमेरिक चलन डॉलरची आहे त्याहीपेक्षा जास्त कदाचित. त्यामुळे एखादी गोष्ट पर्यावरणविरोधी आहे असे प्रतिपादन केले की सगळ्या जगाचे लक्ष त्याकडे जाते. माध्यमांतून गदारोळ उठतो आणि विषय जगाच्या ऐरणीवर येतो! त्यामुळे होते काय- आंदोलन करणाऱ्या संस्थेला जगातून मदतीचा ओघ सुरू होतो. संस्थेच्या प्रमुखांना विविध चर्चा-परिसंवादांमधे मानधन देऊन आमंत्रित केल्या जाते. त्यामुळे पुन्हा प्रसिद्धी मिळते. प्रश्न किती गंभीर आहे यावर पुनः पुन्हा चर्चा होत राहते. वातानुकुलीत सभागृहात बसलेल्या उच्चभ्रू प्रेक्षकांच्या मनात पाण्यात बुडणाऱ्या झोपड्यांकडे हताश होऊन बघणाऱ्या एखाद्या म्हाताऱ्या आदिवासी स्त्रीचा किंवा कुपोषणामुळे ज्याच्या हातापायाच्या काड्या आणि पोटाचा फुगा झालेल्या बाळाला मांडीवर घेऊन रडणाऱ्या अर्धनग्न मातेला बघून फोटो पाहून काय खळबळ उठत असेल याची कल्पना करणे सहज शक्य आहे. ही दृश्ये बघून दगडालाही पाझर फुटेल. नर्मदेच्या खोऱ्यातील किंवा मेळघाटमधील आदिवासींचे प्रश्न खरे आहेत. त्या विषयी कोणतीही शंका नाही; पण ते प्रश्न सोडवण्याच्या प्रयत्न करणाऱ्या सरकारी आणि बिगर सरकारी संस्थांच्या प्रामाणिकपणाबद्दल मात्र शंका घ्यायला भरपूर वाव आहे. कारण सामाजिक प्रश्नांचे असे दृष्य स्वरूप पाहून लोकांना मदत कराविशी वाटते आणि सामाजिक संस्थेकडे पैशांचा ओघ सुरू होतो. कदाचित याच कारणासाठी सरकारने दिलेला पुनर्वसनाचा प्रस्ताव मेधा पाटकरांनी नाकारला असेल, कारण जर प्रश्नच सुटला तर आपल्या मदत कोण करणार? संस्थेला जर पैसाच नाही मिळाला तर उभा केलेला डोलारा चालवायचा कसा हा प्रश्न कोणालाही पडू शकतो. याच चिंतेमुळे, म्हणजे आपण उभे केलेले समाजकार्य निरंतर चालू ठेवण्यासाठी आर्थिक मदतीचा ओघ निरंतर सुरू राहिला पाहिजे, आपणाला हृदयरोग झाला असावा असे प्रतिपादन एका प्रसिद्ध समाजसेवकाने केलेले आहे. त्यामुळे समाजसेवी संस्थांच्या कार्यपद्धतीचा एक पैलू प्रकाशात येतो. आणि म्हणूनच त्यांच्या प्रामाणिकपणावर शंका घेण्यासारखी परिस्थिती उभी राहते. जर तसे नसते तर नर्मदेच्या खोऱ्यातून ज्यांना विस्थापित व्हावे लागले त्यांच्या पुनर्वसनाचा प्रस्ताव ज्याप्रमाणे इतर कार्यकर्त्यांनी मान्य केला तो मेधा पाटकरांनाही मान्य होण्यास हरकत नव्हती. पर्यावरणाच्या होणाऱ्या नुकसानाची तीव्रता कमी व्हावी म्हणून सरकारने एक अभयारण्य प्रस्तावित केले आहे. त्यासही मान्यता देणे सर्वांच्या हिताचे ठरले असते; पण पाटकरांनी त्यास विरोध केला. कारण कदाचित प्रश्न पेटतच राहिला तर त्यावर आपली पोळी भाजता येते. तो थंड पडला तर नाही ही भूमिका त्यांची असावी. त्याही पलीकडे जाऊन पाहिले तर सरदार सरोवरामुळे गुजरातच्या दुष्काळी भागाचा कायापालट होण्यास सुरुवात झाली आहे. लाखो हेक्टर शेतजमीन सिंचनाखाली आली आहे. कित्येक उद्योगांना, गावांना मुबलक पाणीपुरवठा होत आहे. ज्यांना प्यायलाही गोडे पाणी मिळत नव्हते असे कित्येकजण गोड्यापाण्यावर पिके घेऊ लागले आहेत. नर्मदेच्या खोऱ्यात जर एकजण विस्थापित होत असेल तर त्यामुळे निदान १०० जणांना फायदा होणार असल्याचे सर्वोच्च न्यायालयाने २००० साली या संदर्भात दिलेल्या एका निकालात मान्य



केले आहे. खरे पाहता गुजराती लोकांची उद्यमशीलता लक्षात घेतली तर नर्मदेवरील धरणामुळे गुजरातचा जो विकास होणार आहे त्याच्या कित्येक पट जास्त विकास भविष्यात होईल याची खात्री पटते. कारण सिंचनामुळे सुरुवातीला जी सुबत्ता येईल ती पुन्हा उद्योगात गुंतवून त्याहीपेक्षा जास्त सुबत्ता-प्रगती साध्य करण्याचे गुजराती जनतेचे कसब सर्वमान्य आहे. मुंबईचा आर्थिक विकास करणाऱ्या १००० जणांची यादी तयार केली तर त्यात ७०% पेक्षा जास्त गुजराती व्यापारी-उद्योजक असतील यात शंका नाही. आपल्या 'पुरोगामी' महाराष्ट्रात सहकार चळवळीने सार्वजनिक तथा सरकारी पैशांचा कसा स्वाहाकार केला आहे त्याविषयी आपण रोज वाचत आहोत. संपती-समृध्दी कित्येक पटीत वाढवण्याची क्षमता ज्याच्या हाती आहे त्याच्या प्रगतीसाठी काही अदिवासींना विस्थापित व्हावे लागले तरी त्यास विरोध करणे चुकीचे आहे; पण मेधा पाटकरांना पटणार नाही कारण मग आंदोलन कसे चालेल आणि त्यांच्या समाजसेवेच्या दुकानाचे काय होईल?

बीटी बियाणांना विरोध करणाऱ्या हैदराबाद येथील अंतरा या समाजसेवी संस्थेने अपुऱ्या-खोट्या माहितीच्या आधारावर कसे रान उठवले होते हे आपण संघटकच्या एका जुन्या अंकात पाहिले. याच संस्थेने पाळीव प्राण्यांच्या उपचारात डायक्लोफेनॅक सोडियमच्या वापरावर बंदी आणावी म्हणून ओरडा केला. त्याचे कारण काय तर सदर औषधीचा उपचार चालू असताना जर एखादे जनावर दगावले तर त्याचे मास जी गिधाडे खातात तीसुध्दा किडनीच्या आजाराने मरतात आणि त्यामुळेच गिधाडांची संख्या कमी होत आहे असा निष्कर्ष काढला होता. त्यासाठी त्यांनी जो 'अभ्यास' केला त्या अभ्यासासाठी त्या संस्थेकडे परकीय मदतीचा ओघ वळवण्यात आला होता. एखाद्या-दुसऱ्या प्रयोगावर आधारित असले पोकळ निष्कर्ष काढण्याचा आगोचरपणा ह्या समाजसेवी संस्थाच करू जाणे. त्यांना तसे करावे लागते कारण त्यांना त्यांची दुकाने चालवायची असतात. भंडारा जिल्ह्यातील नवेगाव बांध येथे राहणाऱ्या भीमसेन पाटील यांचे निरीक्षण अगदी वेगळे आहे. ते म्हणतात गिधाडांची संख्या कमी होत आहे कारण मरायला टेकलेल्या जनावरास आजकाल कोणी पाळात नाही तर त्यास खाटकाला विकण्यात येते. त्यामुळे पुर्वीच्या काळी जसे मेलेले जनावर त्याची कातडी सोलून गावाबाहेर टकण्यात येत असे तसे आता होत नाही. म्हणून गिधाडांना अन्नाची कमतरता भासत आहे. जर गिधाडे वाचवायची असतील तर गावाबाहेर एक चौथरा करून त्या भोवती जाळी लावून त्यावर जनावराचे मांस ठेवण्यात यावे. ज्यामुळे गिधाडांना ते खाता येईल आणि कुत्र्यांपासून त्यांना संरक्षण मिळेल. भीमसेन पाटलांचे सगळं कुटुंब कित्येक पिढ्यांपासून नवेगावच्या जंगलाचे संवर्धन करत आहेत. त्यांच्या हेतुविषयी कोणतीही शंका घ्यायला जागा नाही. मग खरे कोण? डायक्लोफेनॅकबद्दल ओरडा करणाऱ्या समाजसेवी संस्था का भीमसेन पाटलांसारखा प्रामाणिक शेतकरी? डायक्लोफेनॅकचा वापर जर थांबला तर त्याच्या जागी जे दुसरे औषध वापरावे लागेल त्याची किंमत भरमसाट आहे. जनावरे पाळणे आधीच शेतकऱ्यांस परवडत नाहिय. त्यात जर उपचाराचा खर्च वाढला तर कोणीच जनावरे पाळणार नाही. मग निसर्गाच्या संतुलनाचे जे होईल ते होऊ द्या!

या सर्व गोष्टींचा विचार करता समाजसेवी संस्थांच्या कारभाराचा काळा चेहरा समोर येतो. आणि म्हणूनच आपली दुकाने चालू ठेवण्यासाठी या समाजसेवकांना खोटीनाटी कामे करावी लागत असतील हे आपल्या लक्षात येते. कोणी एखाद्या भिल्ल-गोंड आदीवासीला एखादा गंभीर आजार आहे आणि उपचारासाठी भरपूर पैसे लागतील म्हणून देश-विदेशात आवाहन करतात तर कोणी धारावीमधल्या दारिद्र्याचे भांडवल करतात. कोणी बस्तर तर कोणी उडिसामधे 'कार्य' करतात तिथल्या आदिवासींचा कळावळा आला म्हणून आणि ते करत असताना माओवाद्यांना साथही देतात.

ज्या स्वार्थापोटी राजकारणी मंडळी आपल्या मुलाबाळांना राजकारणात पुढे आणत आपली घराणेशाही चालवतात तसल्याच कारणांसाठी काही समाजसेवी मंडळी आपल्या संस्थांचा कारभार आपल्या पोरबाळांकडे सोपवत असावेत अशी शंका घ्यायला जागा आहे. असल्या समाजसेवी संस्थांचा कारभार, त्यांच्याकडे येणाऱ्या आर्थिक मदतीच्या ओघाचे मूळ शोधण्याचा प्रयत्न केल्यास बरीच धक्कादायक माहिती हाती लागू शकते; पण सरकारच्या अपारदर्शक कार्यपद्धतीच्या नावे बोटे मोडणाऱ्या या समाजसेवी संस्था स्वतःचा कारभार मात्र जनतेपासून लपवून ठेवतात. त्यांचे वरवरचे हेतू दिसण्यास वेगळे असले तरी अंतःस्थ हेतू काय असावेत याची स्पष्ट कल्पना कोणाही सुजाण व्यक्तीस येऊ शकते. दुर्दैवाने ही समाजसेवी मंडळी जोवर वातानुकुलीत सभागृहांतून उच्चभ्रु समाजापुढे पिडीत-शोषीत समाजाच्या हालअपेष्टांचे चित्रण हवे तसे करत राहतील, समोरचे चित्र खरे आहे का याची शहानिशा न करता ही उच्चभ्रु मंडळी डोळ्यांत पाणी आणून आपला पैसा 'समाजकार्यासाठी' देत राहतील तोवर ही समाजसेवेची दुकाने चालूच राहतील. कारण खरी समाजसेवा कोणालाच करायची नाहीय. सर्वांना आपली दुकाने चालू ठेवायची आहेत. समाजसेवी संस्थांना पैसा मिळतो म्हणून आणि उच्चभ्रु समाजाला आपण आपल्याकडून काही केले याचे समाधान मिळते म्हणून.

**शेतकरी संघटक ब्युरो**

■■

# काँग्रेसचा डाव राष्ट्रवादीच्या वर्मी घाव

**छोटी रक्कम शेतकऱ्यांकडून घेऊन बाकीची रक्कम सरकारने भांडवल म्हणून कर्जाच्या रूपाने देऊन सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, दूधडेअरी, अन्नप्रक्रिया उद्योग, धान्य साठवणे इत्यादींसाठी उपाययोजना करण्यात आली. त्यालाच आपण सहकार म्हणतो. मात्र ही पवित्र गंगा ग्रामीण भागाच्या विकासासाठी न वापरता शेतकऱ्यांच्या शोषणाचे साधन बनली. ग्रामीण भागातील जनतेला प्रत्येक गोष्टीसाठी सहकारी सोसायटी, जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्या मकडी जालमध्ये फसवून ठेवण्यात आले. त्याने कितीही धडपड केली तरी त्यातून बाहेर पडणे अशक्य!**

**'लूट करा आणि सूट मिळवा'** अशा पद्धतीचे सहकाराचे धोरण सध्या महाराष्ट्रात राबविले जात आहे. अर्थात हे धोरण बऱ्याच वर्षांपासून सुरू आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे संचालक मंडळ तडकाफडकी बरखास्त करून रिझर्व्ह बँकेने प्रशासकाची नेमणूक केल्यामुळे दोन्हीही काँग्रेस एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करीत आहेत. निवडणुका जवळ येत असल्याने अगोदरच आम्ही स्वतंत्रपणे निवडणुका लढवू शकतो. स्वबळावर निवडणुका लढवून दाखवू हा निवडणुकी अगोदर वापरण्यात येणारा फंडा दोन्ही पक्षांनी सुरू केला. हा फंडा मतदारांचे त्यांच्या मूलभूत प्रश्नांकडे लक्ष न जाता या पक्षांच्या भांडणाकडे लक्ष जावे यासाठी युती आणि आघाडी दोन्हीही वापरतात. आता या पक्षांचे काय होईल? किती जागा येतील? कोणाला कुठे जागा सोडल्या जातील? आणि खरोखरच दोन्हीही पक्ष वेगवेगळे निवडणूक लढवतील का? त्यानंतरचे चित्र काय असेल? विरोधी पक्षाची भूमिका काय असेल? यातच सर्व वेळ खर्च केला जात आहे. निवडून आल्यावर काय करणार? आणि आमचा स्थानिक स्वराज्य संस्थांचा व इतर निवडणुकींचा जाहीरनामा काय आहे? याबद्दल कोणीही बोलत नाहीत. दररोज वर्तमानपत्रात एकमेकांवर आक्रमक झालेले आणि डरकाळी फोडणारे राजकारणी दिसत आहेत. ही लुटूपुटूची लढाई चालू असतानाच व मतदारांचे मन विचलित करण्याचा प्रयत्न चालू असतानाच महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेवर संचालक मंडळाच्या बरखास्तीचा घणाघात झाला आणि काही काळ तरी दोन्ही



ज्ञानेश्वर शेलार

पक्षात खरोखरच भांडणं सुरू झाले. गेल्या १५-२० दिवसांपासून हे भांडण विकोपाला जाते की काय? आणि आघाडी तुटते की काय? असे वातावरण होते. ते निवळत आले आहे. झालेली कारवाई योग्यच आहे, असे राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा म्हणायला लागले आहेत. याचाच अर्थ काहीतरी सारवासारव झालेली आहे व ते प्रकरण मिटण्याच्या मार्गावर आहे. काँग्रेसने अगोदर पासूनच यात आमचा हात नाही. जे काही केले ते रिझर्व्ह बँकेने केले अशी भूमिका घेतली. यातून एक मात्र निष्पन्न होत आहे, की वर्षानुवर्षे राज्य सहकारी बँकेमध्ये चाललेल्या अनागोंदी कारभाराची लक्तरे वेशीवर टांगली होती. दोघांच्या भांडणातून निश्चितच लोकांना जे माहीत नव्हते ते समोर आले. भांडणाचा तोटा काहीच झाला नाही. झाला तर जनतेला फायदाच झाला आहे.

ग्रामीण भागातील व शेतीसाठीच्या वित्त पुरवठ्याची त्रिस्तरीय रचना केलेली आहे. यामध्ये नाबार्ड, राज्य सहकारी बँक व जिल्हा मध्यवर्ती बँका अशी उतरंड रचलेली

आहे. सरकार जेवढाही वित्तपुरवठा शेती व ग्रामीणसाठी करते तो सर्व पैसा वरील मार्गाने व माध्यमातून पोचतो. राज्य सहकारी बँकेचा इतिहास पाहिल्यास ११ ऑक्टोबर १९११ ला सेंट्रल को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी म्हणून इंग्रजी अमदानीत सुरू झाली. नंतर या क्रेडीट सोसायटीचे विदर्भ सहकारी बँकेत विलीनीकरण झाले. महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर वित्त पुरवठ्याच्या सोईसाठी १ मे १९६१ पासून महाराष्ट्र राज्य सहकारी बँक असे तिचे रूपांतर करण्यात आले. १ मे १९६६ पासून बँकेने परवान्यासाठी रिझर्व्ह बँकेकडे अर्ज केला. मात्र या अर्जावर कुठल्याही प्रकारची कार्यवाही झालेली नसून बँकेची रिझर्व्ह बँकेकडे नोंदणी होऊन परवाना मिळालेला नाही असेही उघडकीस आलेले आहे. सरकारी पतपुरवठा जिल्हा सहकारी बँका, नागरी सहकारी बँका, पतपेढ्या व इतर छोट्यामोठ्या उद्योगव्यवसायांना या बँकेमार्फत केला जातो.

बँकेवर १९८८ ते १९९८ पर्यंत शरद पवार यांनी सत्ता गाजविली. त्यानंतर अजितदादांची हुकूमत या बँकेवर आहे. बँकेची वार्षिक उलाढाल २८ हजार कोटींची आहे. थकहमी साखर कारखान्यांना २३०० कोटी व सूत गिरण्यांना ४५५ कोटींची अशी आहे. नेमके संचालक मंडळ बरखास्त करण्याची व प्रशासक नेमण्याची तडकाफडकी झालेली कारवाई का झाली याची कारणे शोधली असता - ज्या कारखान्यांना व सूतगिरण्यांना इतर अन्नप्रक्रिया उद्योगांना थकहमी दिलेली आहे, ते उद्योगच सध्या एकामागोमाग एक बंद पडत आहेत किंवा अवसायानात निघत आहेत. त्यातून बँकेला जो पैसा कर्जाच्या रूपाने वाटला तो व्याज-मुद्दल तर सोडाच; पण अजिबात एक पैसाही परत न मिळण्याच्या काही घटना घडल्यात. सरकारने दिलेली थकहमीची रक्कम बँकेला मिळावी अशी पद्धत आहे; परंतु कॅगने आपल्या अहवालात बँकेवर अतिशय गंभीर ताशेरे ओढले आहेत. त्यामध्ये कुठल्याही प्रकारचे तारण न घेता कर्जपुरवठा करणे, ज्या कारखान्यांची व सूतगिरण्यांची किंवा वित्तसंस्थांची परतफेडीची ऐपत नाही अशांनाही कुठल्याही प्रकारची शहानिशा न करता भरमसाट कर्जे देणे, काही वेळेस तर अगोदर कर्ज मंजूर झालेले आहे




व नंतर कर्जासाठी अर्ज देण्यात आला आहे. कोट्यवधी रुपयांची कर्जे वाटताना कर्जदारांच्या अर्जावर सह्यासुद्धा घेतलेल्या नाहीत. आपल्या गटातील किंवा पक्षाच्या उद्योगांना कर्जे देताना रिझर्व्ह बँकेने घालून दिलेल्या नियमांची सरळसरळ पायमल्ली करण्यात आली आहे. सहकारी साखर कारखाने आणि सूतगिरण्या चालवताना ज्या पद्धतीने सावळा गोंधळ सुरू असतो, तीच पद्धत सहकारात मुरलेल्या पक्षीय राजकारणाने वेढलेल्या आणि सर्व साखर कारखाने, सूत गिरण्या, अन्नप्रक्रिया उद्योग, दूध डेअरी याचप्रमाणे राज्य सहकारी बँक व जिल्हा सहकारी बँका छोट्या पतसंस्था राजकारणाचे अड्डे म्हणूनच वापरले गेले. प्रत्येक उद्योगाचे व वित्तसंस्थांचे वेगळे नियम, कायदे व गृहितके असतात याचा विसर पडला. आपल्या जागा किती निवडून येतात. संचालक मंडळावर आपल्यातले किती? अध्यक्ष कोणाचा असावा? आणि पुढचे राजकारण करायचे तर या सर्व संस्था अगदी गावातील सोसायटीपासून, ग्रामपंचायतीपासून तर दिल्लीतील सरकारपर्यंत आपल्याच ताब्यात राहिल्या पाहिजेत हे सर्वसाधारण धोरण वित्तसंस्थांमध्येही राबवले गेले. राजकारणी लोकांनी आपली सत्ता टिकवण्यासाठी वर्षानुवर्षे त्यांचा वापर केला. आता जे व्हायचे ते झालेच आहे.

ज्या ज्या साखर कारखान्यांना व सूत गिरण्यांना राज्य सहकारी बँकेने वित्त पुरवठा केला त्या बुडीत निघाल्या. या सर्व राजकारणी लोकांचा त्या चालू असताना त्यांचे सर्व राजकारण व अर्थकारण चालूच असते. त्यात कसलाही वांधा येत नाही. बुडीत काढल्या नंतरही त्याचा फायदाच व्हावा त्यासाठी राज्य सरकारची थकहमी सर्रास वापरली जात आहे. कारखाने, सूत गिरण्या बुडवायच्या त्या तोट्यात आहेत आणि ग्रामीण भागाचा विकास, शेतकऱ्यांचे भले करायचे तर या संस्था चालल्या पाहिजेत...! मग सरकारने त्यात पैसे ओतायचे. दोन-पाच वर्षांनंतर पुन्हा तोटा, पुन्हा सरकारने पैसे ओतायचे. लोकांनी कराच्या रूपाने जमा केलेल्या पैशांवर हा सरळसरळ डल्ला मारण्याचाच प्रकार आहे. म्हणूनच याला आता लूट करा आणि सूट मिळवा अशी पद्धत म्हणता येईल.

कारखाने विक्री काढल्यानंतरही बऱ्याच कारखान्यांची खरेदी ही राजकारणी लोकांनीच केली आहे. काही कारखाने तर त्यांच्या

**ज्या ज्या साखर कारखान्यांना व सूत गिरण्यांना राज्य सहकारी बँकेने वित्त पुरवठा केला त्या बुडीत निघाल्या. या सर्व राजकारणी लोकांचा त्या चालू असताना त्यांचे सर्व राजकारण व अर्थकारण चालूच असते. त्यात कसलाही वांधा येत नाही. बुडीत काढल्या नंतरही त्याचा फायदाच व्हावा त्यासाठी राज्य सरकारची थकहमी सर्रास वापरली जात आहे. कारखाने, सूत गिरण्या बुडवायच्या त्या तोट्यात आहेत आणि ग्रामीण भागाचा विकास, शेतकऱ्यांचे भले करायचे तर या संस्था चालल्या पाहिजेत...! मग सरकारने त्यात पैसे ओतायचे. दोन-पाच वर्षांनंतर पुन्हा तोटा, पुन्हा सरकारने पैसे ओतायचे. लोकांनी कराच्या रूपाने जमा केलेल्या पैशांवर हा सरळसरळ डल्ला मारण्याचाच प्रकार आहे. म्हणूनच याला आता लूट करा आणि सूट मिळवा अशी पद्धत म्हणता येईल.**

विक्रीसाठी जी न्यूनतम किंमत ठेवली आहे त्यापेक्षाही कितीतरी कमी किमतीला विकल्या गेले आहेत. त्यातूनच आलेल्या पैशांचा बँकेकडे कर्जाचा भरणा केलेला नाही. बँकेचे कर्ज १०० कोटी असेल, तर कारखाना १० कोटींनाच विकला गेला. बँकेकडे परतफेडीच्या रूपाने कारखान्याची इतर देणी देऊन काहीही जमा झाले नाही. याचाच फटका राज्य सहकारी बँकेला बसला आहे.

धनंजयराव गाडगीळ व वैकुंठलाल मेहता या अर्थतज्ज्ञांनी देशातील सहकारी चळवळीची सुरुवात महाराष्ट्रातून केली. स्वातंत्र्याच्या काळानंतर लगेच कुणीही खासगी भांडवलदार उद्योगांमधून गुंतवणूक करण्यासाठी फारसे उत्सुक नव्हते. त्यातही शेती आणि ग्रामीण भागात तर कुणीही फिरकणे शक्य नव्हते. यावर उपाय योजना म्हणून अगदी छोटी रक्कम शेतकऱ्यांकडून घेऊन बाकीची रक्कम सरकारने भांडवल म्हणून कर्जाच्या रूपाने देऊन सहकारी साखर कारखाने, सूतगिरण्या, दूधडेअरी, अन्नप्रक्रिया उद्योग, धान्य साठवणे इत्यादींसाठी उपाययोजना करण्यात आली. त्यालाच आपण सहकार म्हणतो. मात्र ही पवित्र गंगा ग्रामीण भागाच्या विकासासाठी न वापरता शेतकऱ्यांच्या शोषणाचे साधन बनली. ग्रामीण भागातील जनतेला प्रत्येक गोष्टीसाठी सहकारी सोसायटी, जिल्हा मध्यवर्ती बँक यांच्या मकडी जालमध्ये फसवून ठेवण्यात आले. त्याने कितीही धडपड केली तरी त्यातून बाहेर पडणे अशक्य! या बँकांनी अवाच्या सव्वा व्याज आकारणी करणे, वर्षानुवर्षे हिशेब न देणे, कर्जाचे दरवर्षी नुतनीकरण म्हणून मागचे व्याज व मुद्दल काढून घेऊन शेतकऱ्यांच्या हातात तुटपूंजी रक्कम देणे, जेणेकरून तो पुनः पुन्हा बँकेचे उंबरठे झिजवील अशी व्यवस्था करून ठेवली. ही पवित्र गंगा शेतकऱ्यांच्या दारात येईपर्यंत छोटे गटार झाले आहे. आता तर महाराष्ट्र राज्य सहकारी बँक ते गावातील छोटी सोसायटी हे सगळं वित्त पुरवठ्याची साखळी शेतकऱ्यांच्या गळ्याचा गळफास बनली आहे.

या सर्व गदारोळात आता पुन्हा केंद्र सरकारमध्ये महाराष्ट्रातील राजकारण्यांनी या बँकेवर प्रणव मुखर्जींच्या माध्यमातून कारवाई होऊ नये यासाठी जी फिल्डींग लावून ठेवली होती ती वाया गेली आहे. एका खासदाराने रिझर्व्ह बँकेकडे राज्य सहकारी बँकेत चाललेल्या अनागोंदीचा पाढा पत्र पाठवून वाचला. पाच महिन्यांपूर्वीच हे पत्र पोहोचले. दिल्लीतील वजनामुळे राज्य सहकारी बँकेवर काहीही कारवाई झाली नाही. दिल्लीतील सिटी बँकेवर मात्र कारभारातील त्रुटीमुळे लगेच कारवाई झाली. अशी कारवाई महाराष्ट्रात का होत नाही. नसेल तर संसदेत प्रश्न उपस्थित करावा लागेल. असे प्रकरण पुढे आल्याने रिझर्व्ह बँकेने तडकाफडकी कलम १११ (अ) नुसार कारवाई केली. या कलमानुसार बँकेला अगोदर कुठल्याही प्रकारची सूचना देण्याची गरज नाही. कलम ७८ नुसार कारवाई होणार असेल तर मात्र बँकेला अगोदर दहा दिवस कळवणे आवश्यक असते. संचालक मंडळाला कोर्टकचेऱ्या करण्याची उसंतही मिळालेली नाही. त्यामुळे सगळा जळफळाट आणि वादावादी सुरू आहे. ही कारवाई काँग्रेसनेच केली हा समज दृढ झाला. आघाडीतील दोन्ही पक्ष एकत्र कारभार करत असले तरी एकमेकांना शह-काटशह देण्याची कोणतीही संधी सोडली जात नाही. यात कधी कधी एकमेकांना मोठा टोला बसतो; पण सत्तेत तर राहायचे. आता झालेली कारवाई रिझर्व्ह बँकेने केलेली आहे, अशी सारवासारव सुरू आहे. आणखीन चार-आठ दिवसांत नवीन फिल्डींग लावून दिल्लीवरून सुत्रे हलल्यास फारसे काही निष्पन्न होणार नाही. कॅगने ज्या ज्या गोष्टींसाठी म्हणजे ताळेबंदात एनपीएची तरतूद नसणे. नफातोटा न दर्शविणे. अयोग्य गोष्टींवर खर्च करणे. अशा महत्त्वाच्या त्रुटी दाखविल्या आहेत. त्या काही फारशा गंभीर नाहीत. अशा त्रुटी सर्वच वित्तसंस्थांच्या बाबतीत कमी अधिक दाखवल्याच जातात. त्यात वावगे काय? उलट बँक जर बुडाली. तर ग्रामीण भागात वित्तपुरवठा कसा होईल? शेतकऱ्यांच्या भल्यासाठी आणि ग्रामीण भागाच्या विकासासाठी उलट आता केंद्र सरकारनेच नाबार्डच्या माध्यमातून बँकेला हातभार लावावा आणि काही कोटींची मदत करून वाचवावे. महाराष्ट्रातील साखर कारखाने, सूतगिरण्या, सहकारी बँका वाचल्या पाहिजेत. एवढेच नव्हे तर राजकारणीही वाचले पाहिजेत अशी मखलाशी करून हे बँकेला पडलेले भगदाड बुजवण्याचा प्रयत्न चालू आहे. हा सगळा पैसा शेवटी येतो कुठून हा प्रश्न करदात्यांना पडणार आहे का?

'बरे झाले देवा निघाले दिवाळे' असे संत तुकारामांनी म्हणून ठेवले आहे. आताही असेच म्हटले जाईल आणि पुन्हा मदत म्हणून लोण्याचा गोळा कुठून मिळवायचा याची चाचपणी सुरू होईल. दिल्लीवर दबाव टाकण्यालाही मागेपुढे पाहिले जाणार नाही.

**ज्ञानेश्वर शेलार**
औरंगाबाद. मो. ९२२६७९७०१८

■■

# पर्यावरणवाद्यांच्या निशाणावर शेतकरी!

**भारतीय शेतकरी आजपर्यंत सरकार व निसर्ग यांच्या लहरीच्या जात्यात भरडला जात होता. मोठा गाजावाजा करून आलेल्या जागतिकीकरणाने त्याची यातून सुटका झालीच नाही. उलट जागतिकीकरणाने त्याचे जगणे मुश्कील करणारे नवे शत्रू निर्माण केले आहेत. पर्यावरणवादी हे शेतकऱ्यांचे असेच नवे शत्रू म्हणून पुढे येत आहेत! सतत पर्यावरणाची टिमकी वाजविणारे पर्यावरणमंत्री जयराम रमेश यांनीसुद्धा जाहीरपणे मान्य केले आहे, की आपल्याकडे एन्डोसल्फानला पर्याय उपलब्ध नसल्याने याबाबत विचारपूर्वक निर्णय घेण्याची गरज आहे. यावरूनही सर्वोच्च न्यायालयाने बंदी घालण्यात घिसाडघाई केल्याचे लक्षात येईल. गेल्या ४० वर्षांपासून भारतात हे कीटकनाशक मोठ्या प्रमाणात वापरले जात आहे. ते आणखी दोन महीने- तज्ज्ञांचा अहवाल येईपर्यंत- वापरल्याने कोणते आकाश कोसळणार होते?**

जगभरातील व भारतीय पर्यावरणवाद्यांनी बीटी कॉटन विरुद्ध केलेला प्रचार आणि अपप्रचार याला भीक न घालता भारतीय शेतकऱ्यांनी बीटी कॉटनला पहिली पसंती देऊन त्याचा पेरा मोठ्या प्रमाणात वाढविला. हुशार आणि विद्वान पर्यावरणवाद्यांच्या तुलनेत अशिक्षित व अल्पशिक्षित शेतकऱ्याचे उपजत शहानपण किती श्रेष्ठ आहे हे या निर्णयाने दाखवून दिले आहे; पण पर्यावरणवाद्यांच्या आक्रस्ताळेपणाने बीटी कॉटन विलंबाने शेतकऱ्यांपर्यंत पोचले. तोपर्यंत चीनसारख्या देशांनी कापूस उत्पादनात आघाडी घेऊन जागतिक बाजारपेठेत आपला दबदबा वाढविला. या बाबतीत पर्यावरणवाद्यांनी भारतीय शेतकऱ्याला पिछाडीवर ढकलले. मात्र त्यांनी अशा प्रकारच्या बियाण्यांविरुद्ध जो बागुलबोवा उभा केला होता त्या प्रमाणे विपरीत असे काहीही घडलेले नाही हा एक दशकाचा अनुभव सांगतो; पण पर्यावरणवादी म्हणजे काही अनुभवाने शहाणे होणारे शेतकरी नव्हेत. किंबहुना शेतीशी संबंधच नसल्याने दुरून साजीरी-गोजिरी व हिरवी-हिरवी दिसणारी शेती भारतीय अडाणी शेतकरी नासवीत असल्याचे तूणतुणे वाजवू शकतात. बीटी कॉटनप्रमाणेच त्यांनी बीटी वांग्याविरुद्ध आघाडी उघडून ते शेतकऱ्यांपर्यंत विलंबाने पोचेल अशी व्यवस्था त्यांनी पर्यावरणमंत्री जयराम रमेश यांना हाताशी धरून केली आहे. आता तब्बल ५० वर्षांनंतर यांना भारतीय शेतकरी मोठ्या प्रमाणात वापरीत असलेले कीटकनाशक एन्डोसल्फान हे आरोग्यविघातक व पर्यावरणाला मारक असल्याचा साक्षात्कार झाला असून त्यांनी आता एन्डोसल्फान बंदीसाठी आघाडी उघडली आहे.

### शेतकऱ्यांचे आवडते कीटकनाशक

एन्डोसल्फान या कीटकनाशकाचा वापर न केलेला शेतकरी भारतात तरी सापडणार नाही. तीन कारणाने हे कीटकनाशक शेतकरी प्रिय आहे. एक- हे बहुविध पिकांसाठी उपयुक्त व गुणकारी आहे. दोन- परागीकरणासाठी अतिशय उपयुक्त अशा मधमाशा व अन्य भ्रमरांवर याचा विपरीत परिणाम होत नाही. शिवाय पिकांसाठी हानीकारक किटकांना फस्त करणाऱ्या उपयुक्त किटकांवरसुद्धा याचा विपरीत परिणाम होत नाही आणि तिसरे महत्त्वाचे कारण म्हणजे एन्डोसल्फान पेटंट मुक्त झाल्याने तुलनेने बरेच स्वस्त पडत असल्याने गरीब भारतीय शेतकऱ्यांच्या फाटक्या खिशांना ते परवडते. साधारणपणे २-३ वर्षांच्या प्रायोगिक तत्त्वावरील परीक्षणानंतर एन्डोसल्फान ७०च्या दशकात भारतीय बाजारात उपलब्ध झाले. तेव्हापासून आजतागायत त्याचा सर्वत्र कमी-अधिक प्रमाणात सातत्याने वापर होत असूनही शेतकऱ्यांनी कधी आरोग्यविषयक तक्रारी केल्या नाहीत. आतापर्यंत भारतीय पर्यावरणवाद्यांनी एन्डोसल्फानबद्दल विशेषत्वाने कोणतीही तक्रार केली नव्हती. शेतीच्या अनुभवाअभावी कीटकनाशकाची उपयुक्तता कळत नसल्याने एकूणच कीटकनाशक प्रकाराबद्दल त्यांचे विरोधाचे खूळ सर्वश्रूत आहे; पण विशीष्ट कीटकनाशकाचा नियोजनपूर्वक विरोध पर्यावरणवादी पहिल्यांदाच करीत आहेत.



सुधाकर जाधव

### एन्डोसल्फान विरोधाचे गौडबंगाल

आज एन्डोसल्फानचा विरोध मुखर आणि प्रखर होत आहे याचे कारण युरोपीय देश या कीटकनाशकाच्या जागतिक पातळीवरील बंदीसाठी प्रयत्नशील आहेत. यासाठी गेली १० वर्षे बंदीचे नियोजन करण्यात ही राष्ट्रे गुंतली आहेत. विशेष म्हणजे ज्या युरोपीय कंपनीकडे









या कीटकनाशकाच्या उत्पादनाचे अधिकार होते त्याच कंपनीने याची निर्मिती क्रमाक्रमाने बंद करण्याचा निर्णय २००१ साली घेतला. कारण हे पेटंट मुक्त झाल्याने इतर देशाने याची निर्मिती सुरू केली होती. कंपनीचा एकाधिकार समाप्त झाला होता. योगायोगाने(?) २००१ सालीच दिल्लीच्या विज्ञान आणि पर्यावरण संशोधन केंद्र या स्वयंसेवी संस्थेने केरळ राज्यातील छोट्या क्षेत्रात पाहणी आणि परीक्षण करून एन्डोसल्फान अनेक रोगाना जन्म देत असल्याचा निष्कर्ष काढला. अन्य राज्यांच्या तुलनेत केरळमध्ये एन्डोसल्फानचा वापर बराच कमी असताना परीक्षणासाठी तिथलेच क्षेत्र का निवडले याला कोणतेही संयुक्तिक कारण देण्यात आले नाही; पण त्या निष्कर्षाच्या आधारे आज एन्डोसल्फानवरील बंदीची मागणी होऊ लागल्याने इंडियन एक्सप्रेसने सत्य जाणून घ्यायचा प्रयत्न केला. त्यातून दिल्लीच्या स्वयंसेवी संस्थेने त्याच क्षेत्राची का निवड केली याचा उलगडा होतो! इंडियन एक्सप्रेसच्या शोध पत्रकाराने लिहिलेल्या लेखातून हे स्पष्ट झाले, की एन्डोसल्फानच्या वापराने जे रोग झाल्याचा दावा करण्यात आला आहे ते रोग त्या क्षेत्रात एन्डोसल्फानच्या वापराला सुरुवात झाली त्याच्या आधीपासून अस्तित्वात होते! सरकारी कागदपत्रांत यासंबंधी पुरावेही आहेत.

**युरोपियन देशांचा पुढाकार**

एन्डोसल्फान निर्मितीत गुंतलेल्या युरोपियन कंपनीने आपले उत्पादन २००५ साली थांबविले आणि त्यानंतर युरोपियन राष्ट्रांना हे उत्पादन मानवी आरोग्य व पर्यावरण यासाठी घातक असल्याचा साक्षात्कार झाला. युरोपियन राष्ट्रांनी आपल्या देशात त्याच्या वापरावर बंदी घालून जगभरातून बंदीसाठी पुढाकार घेतला. मात्र त्यांच्या कंपनीने उत्पादन २००५ साली थांबविल्यावर शिल्लक मालाची २००७ पर्यंत जगभर विक्री केली. आरोग्य विघातक व पर्यावरण विघातक असल्या कारणाने जर उत्पादन थांबविण्यात आले होते तर युरोपियन राष्ट्रांनी बाहेरच्या जगाला हा माल कसा विकू दिला? कंपनीने उत्पादन थांबविणे व युरोपीय राष्ट्रांनी बंदी घालणे या मागे मानवी आरोग्याची काळजी आहे की स्वहित आहे या अंगाने विचार केला तर आश्चर्यकारक सत्य बाहर येते! सदर कीटकनाशक पेटंट मुक्त झाल्याने इतरत्र उत्पादन सुरू झाले. परिणामी मूळ कंपनीचा बाजारातील हिस्सा व नफा पार कमी झाला हे आकड्यांनीच सिद्ध होते! युरोपियन कंपनीने एन्डोसल्फानचे उत्पादन बंद केले तेव्हा या उत्पादनात आणि विक्रीत भारताने प्रचंड आघाडी घेतली होती! भारत हा एन्डोसल्फानचा सर्वात मोठा निर्यातदार देश बनला होता. युरोपियन कंपनी पुढे आपला उद्योग बंद करण्याशिवाय पर्याय नव्हता!

५० वर्षांच्या निर्वेध वापरानंतर एन्डोसल्फान घातक असल्याची उपरती होण्यामागचे हे खरे कारण आहे!

**बंदीसाठी पर्यावरणवाद्यांचा वापर**

एन्डोसल्फानला पर्याय म्हणून दुसरे पेटंट असलेले महागडे कीटकनाशक द्यायचे असेल तर बाजारातून एन्डोसल्फानचे उच्चाटन आवश्यक आहे. त्यासाठी जगभरातील बंदीची मोहिम यशस्वी होणे गरजेचे आहे. यात सर्वांत मोठा अडथळा भारताचा आहे! आणि हा अडथळा दूर करण्यासाठी भारतातील पर्यावरणवाद्यांना हाताशी धरून युरोपियन युनियन भारतात एन्डोसल्फानविरोधी वातावरण निर्माण करीत आहे असे मानण्याइतपत पुरावा पुढे आला आहे. एन्डोसल्फानसंबंधी 'परिक्षण,

संशोधन व प्रचार' यासाठी युरोपियन युनियनने दिल्लीस्थित स्वयंसेवी संस्थेला सढळ हस्ते मदत केल्याचे पुरावे आहेत!

माहिती अधिकाराअंतर्गत विचारलेल्या प्रश्नांच्या उत्तरात भारत सरकारच्या गृहमंत्रालयाने दिल्लीस्थित सीएसइ या संस्थेला २००० ते २००६ दरम्यान ३५ करोड रुपये प्राप्त झाले व यातील ३३ करोडची मदत परदेशातून आली होती! युरोपियन युनियननेही या संस्थेला 'संशोधनासाठी' मदत केल्याचे मान्य केले आहे! भारतीय पर्यावरणवादी परकीय पैसा घेऊन विकास योजनांना व शेतकरीहिताला बाधा आणणाऱ्या कार्यात सदैव लिप्त असतात या आरोपाला एन्डोसल्फान प्रकरणाने पुष्टी दिली आहे.

**सरकारचे दुटप्पी धोरण**

एन्डोसल्फान प्रकरणात गुंतलेल्या याच स्वयंसेवी संस्थेने २००३ साली पेप्सी आणि कोला यांच्या पेयात कीटकनाशकाचे अंश असल्याचे जाहीर केले होते. पेप्सी आणि कोला यांचा विरोध पुरोगामीपणात मोडत असल्याने माध्यमांनी प्रकरण उचलून धरले. निष्कर्ष बरोबर की चूक हे पाहण्यासाठी शरद पवारांच्या अध्यक्षतेखाली संसदीय समिती नेमण्यात आली होती. या समितीनेही संस्थेच्या निष्कर्षाची री ओढली होती; पण ते प्रकरण उचलण्यामागे पेप्सी व कोला या कंपन्या निष्काळजीपणा दाखवून लोकांच्या आरोग्याशी खेळतात हे कारण नव्हते तर कीटकनाशकांचा वापर घातक ठरत आहे हे दाखवून देण्याचा होता हे आता स्पष्ट झाले आहे. कारण संसदीय समितीच्या पुष्टीनंतरदेखील पेप्सी व कोलावर कारवाई झाली नाही किंवा तशी मागणीदेखील कोणी रेटली नाही. मात्र एन्डोसल्फान संबंधीचे निष्कर्ष न तपासताच पर्यावरणवाद्यांनी युरोपियन राष्ट्राच्या इशाऱ्यावर केंद्र सरकारला केरळ राज्यातील एन्डोसल्फानचा कारखाना बंद करायला भाग पाडले आहे. गेल्या आठवड्यातील ही घटना आहे. याचा विरोध झाला नाही तर पुढचे पाऊल एन्डोसल्फानवरील बंदीचे असणार आहे. तसे झाले तर एन्डोसल्फानला पर्यायी कीटकनाशक पट अधिक रक्कम मोजून घ्यावे लागेल. शेती व शेतकऱ्याचे कंबरडे मोडणारा हा निर्णय ठरेल. डाव्या आणि उजव्यात टोकाची मतभिन्नता असली तरी शेतकरी विरोधात त्यांचे एकमत असल्याचे केरळ व कर्नाटक राज्यातील एन्डोसल्फान बंदीवरून सिद्ध झाले आहे.

भारतीय शेतकरी आजपर्यंत सरकार व निसर्ग यांच्या जात्यात भरडला जात होता. मोठा गाजावाजा करून आलेल्या जागतिकीकरणाने त्याची यातून सुटका झालीच नाही. उलट जागतिकीकरणाने त्याचे जगणे मुश्कील करणारे नवे शत्रू निर्माण केले आहेत. पर्यावरणवादी हे शेतकऱ्याचे असेच नवे शत्रू म्हणून पुढे येत आहेत! नंदीग्रामपासून नांदगांव खंडेश्वरपर्यंत आणि नोएडापासून जैतापूरपर्यंत हुशार पर्यावरणवाद्यांनी पारजून दिलेली कुऱ्हाड शेतकरी आपल्या पायावर मारून घेत आला आहे. एन्डोसल्फानच्या बाबतीत मात्र पर्यावरणवादी शेतकऱ्याच्या नावावर स्वतःच कुऱ्हाड चालवू लागले आहेत. कारण शेतकऱ्याला एन्डोसल्फान नको असेल तर तो वापरणार नाही. बंदीची उठाठेव करण्याचे त्याला कारणच नाही. अशी उठाठेव हे पर्यावरणवाद्यान्चेच अंगीकृत कार्य आहे!

**सर्वोच्च न्यायालयाची घिसाडघाई**

हा लेख लिहून झाल्यावर दोन दिवसांनी सर्वोच्च न्यायालयाने आपल्या अंतरिम आदेशाद्वारे एन्डोसल्फानच्या निर्मिती, विक्री आणि वापरावर आठ आठवड्यांसाठी अंतरिम बंदी घातली आहे. या दोन महिन्यांच्या कालावधीत सरकारने एन्डोसल्फानचा मानवी आरोग्यावर होणारा परिणाम तपासण्यासाठी इंडियन कौंसील फॉर मेडिकल रिसर्चच्या मुख्य संचालकाच्या नेतृत्वाखाली एक तज्ज्ञांची समिती नेमावी आणि पर्यावरणावर होणाऱ्या परिणामांचा अभ्यास करण्यासाठी केंद्रीय शेतकी आयुक्त यांच्या नेतृत्वाखाली दुसरी तज्ज्ञ समिती नेमण्याचा आदेश दिला आहे. या दोन्ही समित्यांनी आपला अंतरिम अहवाल आठ आठवड्यांच्या आत सर्वोच्च न्यायालयात सादर करायचा आहे. मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या युवा शाखेने एका याचिकेद्वारे बंदीची मागणी केली होती. ही याचिका दिल्लीस्थित पर्यावरणीय स्वयंसेवी संस्था सीएसइने २००१ साली केरळच्या एका छोट्या खेड्यात पाहणी करून दिलेल्या अहवालाच्या आधारे करण्यात आली आहे. दूसरी स्वयंसेवी संस्था नर्मदा बचाओ आंदोलनाच्या खोटारडेपणाचा अनुभव सर्वोच्च न्यायालयाने नुकताच घेतला असल्याने त्यानी सीएसइच्या अहवालावर विश्वास न ठेवता दुसऱ्या तज्ज्ञ समित्या नेमण्याचा आदेश दिला हे योग्यच झाले; पण न्यायालयापासून सरकारपर्यंत कामाच्या गतीचा जो अनुभव आहे तो लक्षात घेता दोन महिन्यांच्या आत समित्या आणि त्याही तज्ज्ञांच्या स्थापन होऊन त्या अभ्यास करून अंतरिम अहवाल देतील ही स्वप्नवत वाटणारी गोष्ट आहे. समित्या अहवाल सादर करण्यासाठी वेळ मागून घेणार हे ओघाने आलेच. आठ आठवड्यांची बंदी अनेक आठवड्यांसाठी वाढणे अपरिहार्य आहे. दरम्यान पेरण्या होऊन फवारणीची वेळ येईल पण हा घोळ संपलेला नसेल आणि असे गृहीत धरले की चमत्कार घडून तज्ज्ञ समित्यांचा अहवाल अगदी दोन महिन्यांच्या आत सादर होईल तरी प्रश्न संपत नाही. अंतरिम अहवाल एन्डोसल्फानच्या बाजूने आला तरी फवारण्यांसाठी एन्डोसल्फान उपलब्ध असणार नाही, कारण सर्वोच्च न्यायालयाने त्याच्या उत्पादनावर आधीच बंदी घातली आहे. जो काही शिल्लक माल असेल त्याचा काळाबाजार होऊन शेतकऱ्याला अवाच्या सव्वा भाव मोजवा लागेल.

सतत पर्यावरणाची टिमकी वाजविणारे पर्यावरणमंत्री जयराम रमेश यांनीसुद्धा जाहीरपणे मान्य केले आहे, की आपल्याकडे एन्डोसल्फानला पर्याय उपलब्ध नसल्याने याबाबत विचारपूर्वक निर्णय घेण्याची गरज आहे. यावरूनही सर्वोच्च न्यायालयाने बंदी घालण्यात घिसाडघाई केल्याचे लक्षात येईल. गेल्या ४० वर्षांपासून भारतात हे कीटकनाशक मोठ्या प्रमाणात वापरले जात आहे. ते आणखी दोन महीने- तज्ज्ञांचा अहवाल येईपर्यंत- वापरल्याने कोणते आकाश कोसळणार होते?

१० वर्षांपूर्वीच्या अविश्वसनीय अहवालांच्या आधारे आज तातडीने बंदी घालणे हा निव्वळ घिसाड घाईचाच निर्णय नाही तर अविवेकी व अविचारीही आहे. युरोपात जेव्हा हे उत्पादन बंद करण्याचा निर्णय झाला त्यानंतर पाच वर्षांनी टप्प्याटप्प्याने ते उत्पादन बंद करण्यात आले होते.

उत्पादन बंद झाल्यावरसुद्धा त्या कंपनीने शिल्लक माल भारतात दोन वर्षेपर्यंत विकला होता. तेव्हा त्याविरुद्ध कोणी कोर्टात गेले नव्हते वा कोर्टानेही हस्तक्षेप केला नव्हता. एकूणच भारतात शेतकऱ्याच्या बाजूने विचार करायचाच नाही हा इथल्या व्यवस्थेचा पक्का निर्धार दिसतो. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय या निर्धारावर शिक्कामोर्तब करणारा आहे.

**सुधाकर जाधव**

पांढरकवडा, जि.यवतमाळ मो. ९४२२१६८१५८

■■

# महाराष्ट्र राज्य 'स्वाहाकार' बँक

**शरद पवार ही व्यक्ती राहिलेली नाही. ती आता वृत्ती बनली आहे. या वृत्तीला आव्हान सहन होत नाही. आव्हान देणारी व्यक्ती किंवा संस्था त्यांच्या 'ब्लॅक लिस्ट'मध्ये जाते. 'बीसीसीआय'चे जगमोहन दालमिया असोत, 'आयसीएल' सुरू करणारे सुभाषचंद्र गोयल असोत की राज्यातील अर्बन बँकांची 'ॲपेक्स बँक' स्थापन करणारे ओमप्रकाश देवडा असोत, यातील प्रत्येकाने दिलेले आव्हान पवार यांनी मोडून काढले. 'शिखर बँके'च्या निरंकुश कारभाराला पर्याय देणारी 'ॲपेक्स बँक' कायद्यातील तरतुदींचे सोयीचे अर्थ लावत पवार गटाकडून बंद पाडण्यात आली. सत्तेची सर्व सूत्रे आपल्याच हाती ठेवण्याच्या पवार यांच्या अट्टाहासाने राज्याचे होत असलेले नुकसान कधीही भरून न निघणारे आहे...**

संपूर्ण मे महिना शरद पवार आणि कंपूच्या कामगिरींनी गाजतो आहे. तसे पाहिले, तर पृथ्विराज चव्हाण सत्तेवर आल्यापासूनच ही नावे चर्चेत होती. कधी 'दंडुका', तर कधी आणखीही काही असंस्कृत शब्दांनी अजित पवार यांनी महाराष्ट्र गाजवीत ठेवला होता. शिखर बँकेच्या संचालक मंडळाच्या बरखास्तीनंतर मात्र त्यांचा तोल सुटला आणि त्यांनी चक्क विरोधकांचा 'बाप' काढला...! ही असंस्कृत माणसं राज्याला दिशा देणार? वास्तविक राज्य सहकारी बँकेचे काम सर्वांचे कल्याण कसे होईल, हे पाहण्याचे आहे. हे कल्याण करण्यात आणखी कोणी पुढे येत असेल तर त्याला सहकार्य करण्यासाठी बँकेने पुढे यावयास हवे. पण केवळ आर्थिक नाड्या हाती ठेवून राज्याची सत्ता आपल्या मांडीखाली दाबण्याची राजकारणी प्रवृत्ती सर्वांगीण प्रगतीसाठी निश्चितच नुकसानकारक आहे. खरे सांगायचे, तर शरद पवार ही व्यक्ती राहिलेली नाही. ती आता वृत्ती बनली आहे. या वृत्तीला आव्हान सहन होत नाही. आव्हान देणारी व्यक्ती किंवा संस्था त्यांच्या 'ब्लॅक लिस्ट'मध्ये जाते. 'बीसीसीआय'चे जगमोहन दालमिया असोत, 'आयसीएल' सुरू करणारे सुभाषचंद्र गोयल असोत की राज्यातील अर्बन बँकांची 'ॲपेक्स बँक' स्थापन करणारे ओमप्रकाश देवडा असोत, यातील प्रत्येकाने दिलेले आव्हान शरद पवार यांनी मोडून काढले. १९९४ ते २००४ दरम्यान हिंगोलीच्या ओमप्रकाश देवडा यांनी 'ॲपेक्स बँके'च्या रुपाने घालून दिलेले उदाहरण 'राज्य सहकारी बँके'त झालेल्या घोटाळ्यांच्या तुलनेत डोळ्यात अंजन घालणारे आहे.

श्री. देवडा यांच्याबाबत अधिक माहिती घेण्याआधी सध्याच्या शिखर बँकेबाबत थोडे समजावून घेऊ या. 'महाराष्ट्र राज्य सहकार बँक' हा राज्यातील सहकारी चळवळीचा कणा आहे. स्वातंत्र्योत्तर भारतात सहकारी चळवळीला चालना मिळाली आणि महाराष्ट्रात ही चळवळ सर्वाधिक वेगाने फोफावली. सहकारातून सापडलेला उद्धाराचा मार्ग विकासाच्या पायवाटांना राजमार्ग बनवून गेला. मात्र कालांतराने राजकीय महत्वाकांक्षांच्या पूर्तीचे साधन म्हणून सहकाराचा वापर सुरू झाला आणि त्यातून सहकाराचे रुपांतर स्वाहाकारात होण्यास प्रारंभ झाला. ज्या उदात्त हेतूने राज्य सहकारी बँकेची पायाभरणी झाली होती, तो हेतू बाजूला राहिला आणि फक्त बगलबच्च्यांचे हितसंबंध जोपासणारी संस्था असे या बँकेचे स्वरुप शिल्लक राहिले. सहकार तत्वावर उभी राहणारी प्रत्येक चळवळ या बँकेशी संलग्न करण्यात आली होती. एका खास उद्देशाने स्थापन झालेल्या या बँकेद्वारे या क्षेत्राचा विकास व्हावा असे अपेक्षित होते. सहकार तत्वावर उभ्या राहिलेल्या बँका असोत की कारखाने हे सर्व जण या बँकेशी संलग्न होते.



**दत्ता जोशी**
media.care.abd@gmail.com

साधारणपणे १९९० च्या दशकात बँकेची ताकद प्रचंड वाढली होती आणि वाढलेली हीच ताकद बँकेचे उपद्रवमूल्यही

होती. वसंतदादा पाटील यांच्या काळातही तक्रारी होत्याच पण विशेषतः विष्णू अण्णा पाटील यांच्या अध्यक्षपदाच्या कारकीर्दीत या तक्रारींमध्ये मोठी वाढ झाली. एका विशिष्ट पक्षाशी संबंधित संस्थांनाच मदत करण्याचे धोरण या बँकेने स्वीकारले होते, एवढेच नव्हे तर पक्षांतर्गत विरोधक आणि विरोधी पक्ष यांच्या उगवणाऱ्या चळवळींच्या रोपट्यांना उखडून फेकण्याची कृतीही या मंडळींनी केली. सहकारी संस्था उभारण्यासाठी केलेल्या विरोधकांचे कर्जाचे अर्जच फेटाळणे, हव्या असलेल्या रकमेपेक्षा किती तरी कमी रकमेचे कर्ज मंजूर करणे, कर्जाच्या वाटपात हप्ते पाडून देणे, कर्जाची रक्कम प्रत्यक्षात हाती देण्यासाठी खूप वेळ लावणे या सारख्या तक्रारी होत्याच पण त्याच बरोबर प्रत्यक्ष कामकाजातही अनेक अनियमीतता दिसत होत्या. रिझर्व्ह बँकेच्या नियमानुसार संलग्न संस्थांना आपल्या ठेवींतील १० टक्के रक्कम या बँकेकडे ठेव म्हणून ठेवावी लागायची. या ठेवींवर ५ ते ६ टक्के व्याज दिले जायचे. याउलट बाजारपेठेतील व्याजाचा त्या वेळचा दर १३ ते १५ टक्क्यांचा होता. अगदी सहकार बँकही चढ्या दराने व्याजाची वसूली करीत असे. कारखानदारीत या चित्राचा फारसा परिणाम होत नव्हता, कारण जवळजवळ सर्वच कारखानदारी याच गटाच्या ताब्यात होती. मात्र नागरी सहकारी बँकांचा यात खूप कोंडमारा होऊ लागला आणि तेथून बंडखोरीचे स्वर उमटण्यास सुरवात झाली. हिंगोली नागरी सहकारी बँकेचे ओमप्रकाश देवडा यांनी त्यात पुढाकार घेतला होता.

श्री. देवडा यांचे म्हणणे अगदी सरळ होते. सहकारी चळवळीला पूरक ठरण्यासाठी, प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र राज्य सहकार बँकेची स्थापना झालेली आहे. ही राज्यातील शिखर बँक आहे. पण सहकार चळवळीतील प्रत्येक अंगाला प्रोत्साहन देण्यात ही बँक अपुरी ठरत आहे. त्यामुळे, विशेषतः बँकिंगच्या क्षेत्रासाठी स्वतंत्र शिखर बँकेची स्थापना करण्यात यावी, अशी त्यांची मागणी होती. यासाठी त्यांनी मागणी रेटण्यास सुरवात केली. आंदोलने उभारली. काँग्रेसचेच एक ज्येष्ठ नेते शंकरराव चव्हाण यांनी या मागणीला पाठिंबा दिला होता. १९९४ मध्ये श्री. देवडा यांच्या पुढाकारातून नांदेड येथे नागरी सहकारी बँकांचे एक अधिवेशन बोलावण्यात आले. शंकररावांच्या सहाकार्याने तत्कालीन



## मला पडलेले काही प्रश्न-१

मी एक 'आम आदमी' आहे. मला राजकारणातील छक्केपंजे कळत नाहीत. हजारो कोटींची भाषाही कळत नाही. वेतन- भत्ते - ग्रॅज्युईटी - इन्कमटॅक्स वाचविण्यासाठी किती हजारांचे 'एनएसई' करायचे, आदि विचार करणार मी एक सामान्य मध्यमवर्गीय माणूस आहे. अठराशे कोटींची थकहमी राज्य सरकारने द्यावी, अशी मागणी शरद पवार करतात, तेव्हा मला चक्कर येते! एका वृत्तवाहिनीवर कर्ज थकवलेल्या 'टॉप टेन' कारखान्यांची माहिती मिळाली. यामध्ये ६ कारखाने काँग्रेस नेत्यांचे, तीन राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांचे तर एक शिवसेनेच्या नेत्याचा आहे. या पार्श्वभूमीवर मला पडलेले काही प्रश्न इथे मांडावेसे वाटतात. या प्रश्नाची उत्तरे शोधण्याची साधी कुवतही माझ्यात नसावी, याचा मला खेद आहे.

१) शिखर बँकेकडून कर्ज घेणारे कोण होते?
२) या कर्जासाठी शिफारस करणारे कोण होते?
३) त्यांना कर्ज मंजूर करणारे कोण होते?
४) त्या कालावधीत बँकेचे अध्यक्ष व संचालक कोण होते?
५) कर्ज बुडविणारे कोण आहेत?
६) कर्ज बुडविल्याबद्दल कोणाच्या मालमत्ता जप्त झाल्या?
७) कर्ज बुडवूनही कोणाच्या मालमत्ता अद्यापही जप्त झालेल्या नाहीत?
८) जप्त झालेल्यांपैकी किती मालमत्तांचा लिलाव झाला?
९) अद्याप लिलाव न पुकारलेल्या मालमत्तांचे मालक कोण आहेत?
१०) ज्या मालमत्तांचा लिलाव झाला त्यांची किमान विक्री रक्कम कोणी ठरविली होती ?
११) किमान विक्री रकमेपेक्षा कमी किमतीत या मालमत्तांची विक्री करण्यात आली का ?
१२) या मालमत्ता विकत कोणी घेतल्या?
१३) या व्यवहारात शिखर बँकेचे किती नुकसान झाले ?
१४) कारखान्यांनी बुडविलेल्या कर्जाची थकहमी शासनाने का द्यायची?
१५) शासनाने बँकेला द्यावयाचा पैसा शासनाचा आहे की जनतेचा?
१६) जनतेचा असेल, तर जनतेचे या बाबतचे म्हणणे ऐकून घेण्याची काही व्यवस्था आहे काय?

केंद्रीय अर्थमंत्री डॉ. मनमोहनसिंग यांची या अधिवेशनात उपस्थिती होती आणि शिखर बँकेचे तत्कालीन अध्यक्ष विष्णु अण्णा पाटील हे ही या वेळी उपस्थित होते. श्री. देवडा यांनी या व्यासपीठावरून स्वतंत्र शिखर बँकेची आपली भूमिका विस्ताराने स्पष्ट केली व या व्यवस्थेचे महत्वही अधोरेखित केले. राज्य सहकारी बँकेकडून नागरी बँकांची होत असलेली गळचेपीही त्यांनी सर्वांसमोर ठेवली. अर्थमंत्र्यांनी या मागणीची दखल घेतली पण विष्णु अण्णा पाटील यांनी या विषयीची आपली भूमिका तसूभरही न बदलता याच व्यासपीठावरून त्या मागणीला कडाडून विरोध दर्शविला. त्यांनी आपल्या बँकेचा कारभार सुधारण्याची आश्वासने दिली पण प्रत्यक्षात फारसा फरक घडला नाही. शंकरराव चव्हाण यांच्या सहकार्याने ओमप्रकाश देवडा यांनी स्वतंत्र शिखर बँकेच्या स्थापनेची धडपड सुरूच ठेवली.

याच काळात महाराष्ट्रात सत्तांतर घडले. भारतीय जनता पार्टी - शिवसेनेची युती राज्यात सत्तेवर आली. शिखर बँकेच्या संचालकांच्या पक्षांतर्गत विरोधकांपेक्षाही अधिक छळ या विरोधकांनी सहन केलेला होता. या मंडळींना तर सहकार क्षेत्रातच 'नो एन्ट्री' होती. कोणी जिद्दीने आलाच, तर त्याचा पुरता बंदोबस्त करण्याची ताकद संचालक मंडळाकडे होती. राज्याची कायदेशीर सत्ता हाती आली, तरी आर्थिक सत्ता मात्र त्यांच्या हातात नव्हती. कारखाने, बँका, पतसंस्था आणि राज्याची आर्थिक कणा असलेले संपूर्ण सहकार क्षेत्र याच बँकेच्या आधिपत्याखाली असल्यामुळे आणि हे आधिपत्य शरद पवार गटाकडे असल्यामुळे भाजप-शिवसेनेलाही नागरी बँकांची स्वतंत्र शिखर बँक असणे सोयीचे ठरणार होते. त्यामुळे नव्या सरकारने देवडा यांच्या संकल्पनेला पाठिंबा दिला. पण याआधी सरकारने या बँकेला परवानगी नाकारलेली होती. रिझर्व्ह बँकेच्या निकषानुसार अशी स्वतंत्र बँक उभी करण्यासाठी राज्य सरकारचे ना हरकत प्रमाणपत्र मिळणे आवश्यक होते. या स्थितीत ओमप्रकाश देवडा यांनी वेगळा मार्ग चोखाळत, महाराष्ट्राला गोवा राज्याची जोड देत 'ॲपेक्स अर्बन कोऑफरेटीव्ह बँक लि. महाराष्ट्र अँड गोवा' या नावाने बँकेची स्थापना केली आणि 'मल्टीस्टेट' बँकेचा दर्जा मिळवीत थेट केंद्रातून नोंदणी मिळविली. या स्थितीत रिझर्व्ह बँकेने या नव्या ॲपेक्स बँकेला 'नाबार्ड' अंतर्गत लायसन्स बहाल केले. शंकरराव चव्हाण यांच्या माध्यमातून केंद्र सरकारमध्ये आधीपासूनच करून ठेवलेली वातावरणनिर्मिती या प्रसंगी कामास आली आणि राज्यात नव्या शिखर बँकेचा उदय झाला.

रिझर्व्ह बँकेच्याच निकषांनुसार एका राज्यात दोन शिखर बँका असू शकत नाहीत. पण राज्यातील एखाद्या क्षेत्रातील सर्वांनी एकत्र येऊन आपले हितसंबंध जोपासण्यासाठी अशा एखाद्या संस्थेची उभारणी केली, तर त्यास परवानगी मिळत होती. याच तरतुदीचा फायदा घेत नव्या शिखर बँकेची स्थापना झाली व कामकाजही सुरू झाले. साधारण १९९५ ते २००४ असे एक दशक 'ॲपेक्स बँके'चे कामकाज चालू राहिले. या बँकेस मिळालेला प्रतिसाद पवार गटाच्या छातीत धडकी भरविणारा होता. राज्यात स्वतंत्र आर्थिक सत्ताकेंद्र उभे राहू द्यायचेच नाही, या महत्वाकांक्षेने पछाडलेल्या पवार गटाने प्रारंभापासूनच या बँकेला नमोहरम करण्याच्या

१७) ज्या प्रमाणे सामान्य माणसाने कर्ज बुडविले तर त्याची व त्याच्या कुटुंबियांची मालमत्ता जप्त करून कर्जवसुली केली जाते, तशी कर्जवसुली संबंधित कारखान्यांच्या अध्यक्ष व संचालकांच्या मालमत्ता विकून का केली जात नाही?

१८) सार्वजनिक निधीतून खाजगी मालमत्ता निर्माण होण्यास कोण कारणीभूत आहे?

१९) सर्वसामान्य जनता अशा नेतृत्वाला पुन्हा पुन्हा मतदानातून बळ का देते?

२०) राष्ट्रवादीच नव्हे, तर सर्वच पक्ष अथवा व्यक्ती छोटीमोठी सत्ताकेंद्रे वर्षानुवर्षे कशाच्या आधारावर ताब्यात ठेवू शकतात?

## मला पडलेले काही प्रश्न-२

रिझर्व्ह बँकेने शिखर बँकेचे संचालक मंडळ बरखास्त करून दोन वरिष्ठ सनदी अधिकाऱ्यांची प्रशासक म्हणून नियुक्ती केली. राज्याचे प्रधान सचिव (कृषि) श्री. सुधीरकुमार गोयल प्रधान सचिव (नियोजन) श्री. सुधीर श्रीवास्तव हे ते दोन अधिकारी. कोंडीत पकडलेल्या मांजराप्रमाणे चवताळून उठलेल्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांनी या संदर्भात प्रतिक्रियांचा भडिमार सुरू केला. खरे तर बँकेचे संचालक मंडळ हे पक्षाशी बांधील नाही. (त्याची यादी आम्ही सोबत दिलेली आहेच.) ती रिझर्व्ह बँकेच्या नियंत्रणाखाली चालणारी एक स्वतंत्र संस्था आहे. या संस्थेवर प्रशासक नेमल्यानंतर पक्षीय पातळीवर गदारोळ माजविण्याची गरजच काय? शरद पवार यांनी या प्रकरणी प्रतिक्रिया का द्यावी? बँकेचे 'अध्यक्ष' माणिकराव पाटील हे असताना अजित पवार यांच्यासारख्या 'संचालकां'नी बोलण्याचे कामच काय? त्यातही त्यांनी 'बाप' काढण्यामागचा तर्क काय? सहकार क्षेत्र हे स्वतंत्र आहे. ज्या पद्धतीच्या प्रतिक्रिया राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्यांकडून येत आहेत, त्या वरून 'सहकार' हे क्षेत्र काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसची बटिक असलेले क्षेत्र आहे, या मूळ आरोपालाच बळ मिळते आहे, हे या नेत्यांना कळत नाही का? शिखर बँकेच्या मुळावर घातलेला घाव हा फक्त साखर कारखान्यांपुरताच नाही तर अगदी गावोगावच्या सहकारी पतसंस्था आणि जिल्हा बँकांपर्यंत जाऊन पोहोचतो, ज्यांच्या जिवावर काँग्रेस व विशेषतः राष्ट्रवादी काँग्रेसने आपले राजकारण पोसले होते. अशा हजारो सोसायच्या बुडाखाली पोसणे म्हणजेच पक्ष चालविणे असते का? एका शिखर बँकेवरील घावात राष्ट्रवादीचा राज्यभरातील सारा डोलाराच कोसळतो आहे, हेच या पक्षाचे मूळ दुखणे आहे का?

प्रयत्नास सुरवात केली. अखेर २००४ मध्ये त्यांना 'यश' आले. 'नाबार्ड'च्या '२ यूबी' कायद्याअंतर्गत दाद मागत सर्वोच्च न्यायालयात जाऊन निर्णय मिळवून ही बँक पवारांनी बंद पाडली. या कायद्याअंतर्गत एका राज्यात दोन शिखर बँका उभ्या राहू शकत नाहीत, असा त्यांचा दावा होता. पण एखाद्या विशिष्ट क्षेत्राशी संबंधित बँक उभी राहू शकते ही रिझर्व्ह बँकेची तरतूद तेथे अपुरी पडली. महाराष्ट्र राज्य सरकारने नाकारलेले ना हरकत प्रमाणपत्रही पवारांच्या दाव्याला आधार देऊन गेले आणि एक समांतर सहकार चळवळ नामशेष झाली.

ओमप्रकाश देवडा यांच्या नेतृत्वाखाली या बँकेने त्या १० वर्षांत उभारलेले पाहता, कदाचित त्या पुढील काळात विद्यमान शिखर बँकेला आव्हान देत आणखी काही क्षेत्रे बाहेर पडू शकली असती आणि यातून पवारांच्या आर्थिक सत्तेलाच आव्हान मिळाले असते. 'अॅपेक्स' बँकेने या काळात नागरी बँकांकडून जमविलेल्या ठेवी होत्या १८०० कोटी रुपयांच्या ! बँकेने आपल्या कार्यकाळात एकंदर १४ साखर कारखाने उभे केले. काँग्रेसचे बसवराज पाटील असोत, की समाजवादी व्यंकप्पा पत्की असोत की सांगलीचे संभाजी पवार अथवा शिवसेना - भाजपाचे नेते असोत, सर्वांच्याच कारखान्यांना या बँकेने कर्ज दिले. पक्षीय भेद त्यांनी कोठेही पाळला नाही. प्रस्ताव योग्य असेल, तर कारखान्याला हवे असलेले कर्ज एकरकमी मान्य होत असे आणि वर्षभरात कारखाना उभाही राहात असे. कर्ज रकमेची संपूर्ण 'एलसी' एकाच वेळी मिळत असे. त्यामुळे उभारणीतील दिरंगाईमुळे अकारण वाढणारा खर्च आटोक्यात आणण्यात कारखानदारांना मदत झाली. शिखर बँकेकडून कारखाने उभ्या करणाऱ्या 'नावडत्या' नेत्यांचा जो छळ मांडला जात असे, तो गंभीर होता. या बँकेने क्वचितच कोणाला 'वन टाईम एलसी' दिली होती. या शिवाय शिखर बँकेचा व्याजाचा दरही भरमसाठ होता. भरमसाठ व्याजदर आणि कर्ज हाती पडण्यातील दिरंगाई, यामुळे हे कारखाने उभे राहण्या आधीच कर्जात बुडत! अॅपेक्स बँकेने दिलेल्या एलसीच्या पोटी आलेली सर्व बिले १० दिवसांच्या आत अदा करण्याचे धोरण यशस्वीपणे राबविले. नागरी बँकांनाही 'अॅपेक्स बँके'ने ठेवींवर दिलेले व्याज 'शिखर बँके'पेक्षा जास्त दराचे होते. सर्व पक्षांची प्रमुख नेते मंडळी आणि बँकिंग क्षेत्रातील जाणकार मंडळींची नियुक्ती या बँकेच्या संचालक मंडळावर करण्यात आली होती. पक्षीय भेद दूर ठेवून सर्व निर्णय 'मेरीट बेस' होत.

बँक बंद करण्याचा आदेश आल्यानंतर सहकारी बँकांच्या इतिहासात बँकेचे 'अॅसेट्स' वाटप करण्यासाठी प्रशासक नेमल्याची पहिली घटना या बँकेच्या बाबतीत घडली. सर्व बँकांच्या ठेवी व्याजासह परत करण्यात आल्या. राज्य सरकारकडील 'रिडम्पशन शेअर' हा एक प्रकार असतो. कोणतीही बँक हे शेअर सरकारला परत करण्याच्या भानगडीत पडत नाही. हा पैसा संचालकांचे खाजगी कुरण म्हणून राखीव असतो. या बँकेने हे शेअर व्याजासह परत केले. बँक बंद करावी लागताना ज्यांचे देणे होते त्या प्रत्येकाचे देणे पूर्णतः देण्यात आले. अगदी कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या ३० वर्षांच्या सेवेचा मोबदला गृहित धरून एकरकमी भरपाई वाटण्यात आली. अशा बँकेस कामकाज बंद झाल्यानंतरही त्रास देण्याचा प्रयत्न झाला. ही बँक कार्यरत होती तोवर बँकांना कायद्यानुसार प्राप्तीकरातून



## महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेचे विद्यमान संचालक मंडळ पुढीलप्रमाणे आहे

**अध्यक्ष**
श्री. माणिकराव पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस)
**उपाध्यक्ष**
श्री. बाळासाहेब सरनाईक (काँग्रेस)
**संचालक मंडळ**
श्री. अजित पवार - उपमुख्यमंत्री (राष्ट्रवादी काँग्रेस)
श्री. विजयसिंह मोहिते पाटील - माजी उपमुख्यमंत्री (रा.काँ.)
श्री. राजवर्धन कदमबांडे - आमदार (राष्ट्रवादी काँग्रेस)
श्री. ईश्वरलाल जैन - राज्यसभा सदस्य (राष्ट्रवादी काँग्रेस)
श्री. राजेंद्र जैन - आमदार वि. प. (राष्ट्रवादी काँग्रेस)
श्री. पांडुरंग फुंडकर - विरोधी पक्षनेते वि. प. (भाजप)
श्री. अमरसिंह पंडित - माजी आमदार (भाजप)
श्री. आनंदराव आडसुळ - खासदार (शिवसेना)
श्री. जयंत पाटील - आमदार वि. प. (शेकाप)
श्रीमती मीनाक्षी पाटील - आमदार (शेकाप)
**इतर सदस्य**
श्री. यशवंतराव गडाख -माजी खासदार (काँग्रेस)
श्री. विजय वडेट्टीवार - आमदार (काँग्रेस)
श्री. माणिकराव कोकाटे - (राष्ट्रवादी काँग्रेस)
श्रीमती रजनी पाटील - माजी खासदार (काँग्रेस)

सूट होती. बँक बंद झाल्यानंतर त्यांच्यावर प्राप्तीकराची नोटीस बजावण्यात आली! विरोधकांना पूर्णतः नमोहरम करण्याच्याच खेळीचा हा प्रयत्न होता !

या सर्व घडामोडींतून जात आज मागे वळून पाहताना असे लक्षात येते, की बँकेच्या स्थावर मालमत्तेसह आजही ३१२ कोटींचा निधी जमा आहे. सर्व प्रकारची देणी देऊन झाल्यानंतरची ही रक्कम आहे! याशिवाय बँक बंद झाल्यानंतर थंडावलेल्या साखर कारखान्यांच्या वसुलीचे सुमारे २०० कोटींचे येणे बाकी आहे. पण आता ही रक्कम येण्याची शक्यता कमी दिसते!

सत्तेच्या आधाराने शासकीय यंत्रणा वापरून आपले संस्थान उभे करणे, या 'संस्थानिकां'च्या आधारे पक्षसंघटना बळकट करणे हा एककलमी कार्यक्रम शरद पवार यांनी मागील ३० वर्षे राबविला. काँग्रेसमध्ये असताना किंवा नसतानाही त्यांना आधार होता तो त्यांच्या याच 'सहकारी' जाळ्याचा. महाराष्ट्रातील सत्तांतर शरद पवार यांच्याच आशीर्वादाने झाले होते, हे आता लपून राहिलेले नाही. केंद्रातही राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या काळात 'टास्क फोर्स' चे अध्यक्षपद शरद पवार बाळगून होते आणि दिल्लीतही आपला दबदबा टिकवून होते.

शिखर बँकेच्या निमित्ताने पहिल्यांदाच शरद पवार यांच्या या साम्राज्याच्या मुळावरच घाला घातला गेला आहे. करुणानिधी असोत की शरद पवार, या सहकारी पक्षांच्या दबावाखाली वावरत असताना काँग्रेस पक्षाची सतत कोंडी होत होती. ती दूर करण्याची संधी काँग्रेसला या मुळे मिळाली आहे. याचा उपयोग हा पक्ष कसा करून घेतो, यात पवारांचे राजकीय भविष्य दडलेले आहे.

**दत्ता जोशी**
मो. ९२२५३०९०१०

■■



# पेट्रोल भाव वाढीचे कटूसत्य

**[ वस्तुंच्या किमती मुद्दाम दाबून ठेवल्या तर त्या वस्तूंच्या उत्पादनाला शिक्षा केल्यासारखे होईल. त्या वस्तूचे उत्पादन घटून टंचाई आणि भाववाढ होईल. उदाहरणार्थ - शेतीमाल जीवनावश्यक म्हणून त्याच्या किमती बाजारपेठेत नियंत्रणे, बंधने आणून पाडून टाकल्या जातात. त्याचा विपरीत परिणाम शेतीच्या विकासावरच होतो. जीवनावश्यक वस्तू निर्माण केल्याबद्दल शेतकऱ्यांना शिक्षाच केली जाते. म्हणूनच शेतकरी संघटना खुल्या बाजारपेठेच्या बाजूने आहे. तेव्हा पेट्रोल, डिझेल, रॉकेल आणि गॅसची बाजारपेठ खुली असावी. मागणी-पुरवठाप्रमाणे किमती कमीजास्त व्हाव्या, हे रास्त आहे. ]**

आज दि.२२ मे २०११ रोजी केंद्र सरकारने पेट्रोलचे भाव प्रती लिटर रु. ५ ने वाढवण्याचा निर्णय घेतला. पेट्रोलचे भाव आयात क्रूड ऑईलच्या किमतीवर अवलंबून असतात. क्रूड ऑईलच्या किमती जानेवारीपासूनच वाढत होत्या. तथापी ५ राज्यांतील निवडणूका नजरेसमोर ठेवून केंद्र सरकारने किमती वाढवणे जानेवारी पासूनच रोखून ठेवले होते. निवडणूकांचे निकाल झाल्यानंतरच पेट्रोलचे भाव वाढण्याचा सरकारने निर्णय घेतला.

पेट्रोलची किंमतवाढ जानेवारीपासून रोखून धरल्याने तेल कंपन्यांना २०१०-११ वर्षात ७८,२०२ कोटी रुपयांचा तोटा झाला. सदर तोटा कमी करण्यासाठी केंद्र सरकारने तेल कंपन्यांना ४०,९१२ कोटी रुपये अनुदान दिले आहे. शिवाय ओएनजीसी २५,७५० कोटी रुपये तोटा सोसणार आहे. तेल कंपन्यांनी ११०० कोटी रुपयांचा तोटा सोसायचा आहे.

बहुतेक तेलकंपन्या, ओएनजीसी या सरकारी कंपन्यांच आहेत. त्यामुळे फायदा तोट्याचा विचार न करता सरकारच्या आदेशाप्रमाणे त्यांचे कामकाज चालत राहते. आर्थिक स्वास्थाचा विचार न करता राजकीय सोयीसाठी निर्णय घेतले जातात. त्यामुळे या कंपन्यांचे आर्थिक स्वास्थ बिघडतेच. शिवाय कंपन्यांच्या व्यवस्थापनाच्या गुणवत्तेत विपरीत परिणाम होतो. संशोधन व विकास यावर पैसे खर्च करण्याऐवजी अशा अनुदानावर खर्च होऊ लागल्याने भावी विकासावरही विपरीत परिणाम होतात. या संस्थांतील कार्यक्षमताही नष्ट होते.

वास्तविक राजकीय सोयीसाठी, निवडणूकीत मते मिळवण्यासाठी पेट्रोलचे भाव वाढू दिले नाहीत. हा एक राजकीय भ्रष्टाचारच आहे. खरे म्हणजे या विरोधात निवडणूक आयोगाकडे निवडणूकीतील भ्रष्टाचार, मतदारांना आमीष देण्याचा प्रकार म्हणून तक्रार केली पाहिजे. पेट्रोलची नैसर्गिक दरवाढ टाळणे हा भ्रष्टचारच आहे.

वास्तविक सरकारने पेट्रोलच्या किमती बाजारभावाप्रमाणे कमी जास्त करण्याचा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे गेल्यावर्षी पेट्रोलचे भाव काही वेळा वाढवले. एकदा कमीही केले. मात्र निवडणूकीमुळे भाववाढ ५ महिने पुढे ढकलली. यामुळेच पेट्रोलच्या किमतीत एकदम ५ रुपयांनी वाढ करण्याची पाळी आली.

अजित नरदे

पेट्रोलची किंमत खुली करण्याचा सरकारने निर्णय घेतला तरी डिझेल केरोसीन आणि एल.पी.जी. गॅसच्या किमती नियंत्रीतच आहेत. तेल कंपन्यांना प्रती लिटर डिझेल विक्रीमागे १८.१९ रुपये, केरोसीनला प्रती लिटर २९.६९ रुपये आणि गॅस सिलींडरला (१४.२ किलोच्या) ३२९.७३ रुपये तोटा होतो. हा तोटा सरकार भरून देते. आपण सरकारला दिलेल्या कराच्या उत्पन्नातूनच हा तोटा भरला जातो म्हणजेच अप्रत्यक्षपणे त्यांची किंमत आपणच देतो.

जे पैसे रस्ता, वीज, धरणे, आरोग्य आणि पायाभूत सुविधांसाठी सरकारने वापरले पाहीजे. ते पैसे पेट्रोल, गॅस, डिझेलच्या सवलतीसाठी सरकार खर्च करते. त्याचा गरिबांना कमी तर श्रीमंतांनाच जास्त फायदा होतो.

शिवाय अशा धोरणामुळे बाजारात विकृती निर्माण होते. पेट्रोलमध्ये डिझेल, रॉकेलची भेसळ सुरु होते. यामुळे पेट्रोलच्या गाड्या खराब होतात. डिझेलला दिलेल्या अनुदानामुळे पेट्रोलपेक्षा डिझेल खूप स्वस्त होते. यामुळे डिझेलच्या गाड्या वापरण्यासाठी उत्तेजन दिले जाते. वास्तविक छोट्या गाड्या पेट्रोलच्या असणे योग्य आहे. कारण पेट्रोलचे

इंजिन तुलनेने सुटसुटीत व स्वस्त आहे; पण किमतीतील फरकाचा फायदा (की गैरफायदा) घेण्यासाठी डिझेलच्या छोट्या मोटारी बाजारात आल्या. ज्याची किंमत जादा आहे; पण अनुदानामुळे चालवण्याचा प्रति किलोमीटर खर्च कमी येतो. यामुळे डिझेलच्या मोटारी महाग असल्या तरी लोक घेत आहेत. सरकारी अनुदानाचे असे विपरीत परिणाम होतात.

मोठी मालवाहतूक करणाऱ्या, प्रवाशी वाहतूक करणाऱ्या वाहनांसाठी डिझेल स्वस्त ठेवले; पण त्याचा गैरफायदा छोट्या डिझेल मोटारींनी घेतला. तसेच केरोसीनच्या बाबतीतही होत आहे. केरोसीन गरीब लोक स्वयंपाकासाठी वापरतात म्हणून त्याच्या किमती वाढू दिल्या जात नाहीत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमधून विकले जाणारे केरोसीन (रॉकेल) बहुतेक काळ्या बाजारात जाते. हे सर्वांना माहीत असलेले सत्य आहे. रॉकेल विकणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांचा सांगलीत एकदा मोर्चा निघाला होता. पांढरे स्टार्चचे परिटघडीचे कपडे घालणारे हे सुखवस्तू लोक रॉकेलचे विक्रेते आहेत यावर माझा विश्वास बसत नव्हता. या रॉकेलचा मोठ्या प्रमाणात वापर पेट्रोल, डिझेलमध्ये भेसळ करण्यासाठीच होतो. यामुळे पेट्रोलच्या गाड्यांवर विपरीत परिणाम होतो. त्यामुळे होणारे नुकसान वेगळेच.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील रॉकेल लोकांना विकले जाते. त्यातील मोठा भाग हॉटेल, खानावळी, तसेच औद्योगिक वापरासाठीच जादा किंमत घेऊन विकले जाते. हा भ्रष्टाचार टाळण्यासाठी रॉकेल एकाच किमतीत खुल्या बाजारात विकले गेले पाहीजे. यामुळे रॉकेल सहज, सरळ, कोणत्याही दुकानात उपलब्ध होईल, कोणताही भ्रष्टाचार होणार नाही.

घरगुती स्वयंपाकासाठी एल.पी.जी. गॅस वापरला जातो. १४.२ किलो गॅसच्या सिलींडरसाठी आज सरकार ३२९.७३ रुपये अनुदान देत आहे. गॅस सिलींडरची दरवाढ केली तर शहरी मध्यमवर्गीयांना नक्कीच जाचक वाटणार आहे. तरीही लोकांनी दरवाढ खुल्या मनाने स्वीकारली पाहिजे. तसे करण्यात त्यांचाच फायदा आहे.

गॅस सिलींडरला अनुदान दिल्यानेच त्याची खुली बाजरपेठ बंद झाली आहे. सरकारने घरगुती ग्राहकांना आणि व्यावसायीक ग्राहकांना गॅस सिलींडरचे दर वेगवेगळे ठेवले आहेत. यामुळे होते असे, गॅसचे विक्रेते घरगुती ग्राहकांना गॅस देण्याचे टाळतात. तो गॅस जादा किमतीने व्यावसायीक ग्राहकांना देतात. यामुळे घरगुती ग्राहकांना गॅस वेळेवर मिळण्यात अनेक अडचणी येतात.

आज गॅस सिलींडरचे कनेक्शन मिळवणे हे मोठे दिव्यच आहे; पण सुरुवातीला गॅस सिलींडरची बाजारपेठ खुली होती. तेव्हा कोणालाही गॅस सिलींडर सहज, रांग न लावता, कौंटरवर मिळत होते. गॅसचे विक्रेते ग्राहकाच्या मागे लागत होते; पण अनुदानातील भ्रष्टचारामुळे कृत्रिम टंचाई आणि विक्रेत्यांची बाजारपेठ झाली आहे. यात ग्राहकाला काहीही किंमत नाही.

डिझेल, रॉकेल आणि गॅसला दिले जाणारे अनुदान बंद केले तर त्यातून होणारा भ्रष्टाचार टाळता येईल. डिझेलच्या मोटारींना विनाकारण उत्तेजन मिळणार नाही. पेट्रोलमधील रॉकेलची भेसळ बंद होईल. खराब इंधनामुळे वाहनांचे नुकसान होणार नाही. रॉकेल विक्रीतील भ्रष्टाचार बंद होईल. गॅस सिलींडर खुल्या बाजारात सहज कोणालाही मिळू लागतील. गॅस विक्रेते ग्राहकांच्या मागे लागतील. सेवा देण्याचा प्रयत्न करतील.

गॅसचे दर वाढल्याने शहरी मध्यमवर्गीयांना ३२९ रु. जादा द्यावे लागतील. म्हणजे कुटुंबाचा खर्च रोज १० रुपये वाढेल. म्हणजे माणसी खर्च रोज फक्त २ रुपये वाढेल. ही भाववाढ फार जादा नाही. कोणालाही एखादी वस्तू स्वस्त मिळावी तर हवी असते; पण स्वस्ताई सरकारी अनुदानातून आली तर भ्रष्टाचार व टंचाई निर्माण होण्याचा धोका असतो.

पेट्रोल दरवाढीचा मलाही मोठा फटका बसणार आहे. मीही एक शेतकरी आणि छोटा व्यावसायिक आहे. माझ्याकडे एक चारचाकी पेट्रोल मोटार आणि ५ मोटारसायकली आहेत. पेट्रोल दरवाढीची मोठी किंमत मलाही द्यावी लागणार आहे. तथापी, वैयक्तिक स्वार्थापेक्षा व्यापक राष्ट्रहित महत्त्वाचे समजून मी पेट्रोल दरवाढीचे समर्थन करीत आहे.

वस्तुंच्या किमती मुद्दाम दाबून ठेवल्या तर त्या वस्तूंच्या उत्पादनाला शिक्षा केल्यासारखे होईल. त्या वस्तूचे उत्पादन घटून टंचाई आणि भाववाढ होईल. उदाहरणार्थ - शेतीमाल जीवनावश्यक म्हणून त्याच्या किमती बाजारपेठेत नियंत्रणे, बंधने आणून पाडून टाकल्या जातात. त्याचा विपरीत परिणाम शेतीच्या विकासावरच होतो. जीवनावश्यक वस्तू निर्माण केल्याबद्दल शेतकऱ्यांना शिक्षाच केली जाते. म्हणूनच शेतकरी संघटना खुल्या बाजारपेठेच्या बाजूने आहे. तेव्हा पेट्रोल, डिझेल, रॉकेल आणि गॅसची बाजारपेठ खुली असावी. मागणी-पुरवठाप्रमाणे किमती कमीजास्त व्हाव्या, हे रास्त आहे.

किंमत मुद्दा कमी ठेवल्यास त्या वस्तूंच्या उधळपट्टीला उत्तेजन दिल्यासारखे होते. मौल्यवान वस्तू काटकसरीने वापरली पाहिजे, हा संदेश ग्राहकांना मिळत नाही. काटकसरीने वापर करण्याला उत्तेजन मिळत नाही.

पेट्रोलच्या दरवाढीची बातमी सर्वच वृत्तपत्रांनी अतिशय भडकपणे दिली आहे. केवळ वाचकांचा अनुनय करण्यासाठी अशा भडक बातम्या दिल्या जातात. यामुळे लोकांना निष्कारण अन्याय झाल्याची भावना निर्माण होते. पेट्रोल, डिझेल, रॉकेल आणि गॅस स्वस्त आणि उत्पादन खर्चापेक्षा कमी दरात मिळणे हा आपला हक्क असल्याची भावना निर्माण होते. अशा चुकीच्या लोकमतांच्या दबावाखाली सरकार दरवाढ टाळते. यातून भ्रष्टाचार, टंचाई आणि काळाबाजार निर्माण होते.

हे टाळायचे असेल तर पेट्रोल, डिझेल, रॉकेल आणि गॅसची बाजारपेठ खुली झाली पाहिजे. बाजार नियमाप्रमाणे पेट्रोलचे भाव कमीजास्त होऊ द्या. बाजारपेठेतील सरकारी हस्तक्षेपामुळेच भ्रष्टाचार निर्माण होतो. सरकारी हस्तक्षेपाला कमी वाव दिल्यानेच भ्रष्टाचार कमी करता येईल. हे सरकार आणि अण्णा हजारे यांनीही लक्षात घ्यावे. खुली बाजारपेठ हाच भ्रष्टाचाराला आळा घालण्याचा एक उपाय आहे; पण एकमेव नाही. इतरही काही उपाय योजावे लागतील. हे खरेच.

(ताजा कलम - सदर लेख पूर्ण झाल्यानंतर सरकार डिझेल, गॅसचे दरवाढ करण्याचा विचार करीत असल्याची बातमी आहे; पण संभाव्य दरवाढ अतिशय कमी आहे असे दिसते. तरीही वृत्तपत्रांनी यावर खूपच आक्रोश सुरू केला आहे. सरकार दरवाढीला घाबरत आहे. तर विरोधक राजकीय फायदा घेण्याच्या मनःस्थितीत आहेत. कटू सत्य सांगण्याची कोणाचीच तयारी नाही, हेच खरे. दि. १६ मे २०११)

**अजित नरदे**

निमंत्रक, इंडियन लिबरल ग्रुप, महाराष्ट्र
१८ ए, श्रद्धा संकूल
६ वी गल्ली, जयसिंगपूर
जि.कोल्हापूर, ४१६ १०१
मोबाईल नं. ९८२२४ ५३३१०

■■

# श्याम्याची बिमारी

**[ श्याम्याच्या मते लेखनासाठी दोन पर्याय असू शकतात : १) लिहिणाऱ्याने वाटेल तसे लिहीत राहायचे, ते इतरांवर लादत राहायचे आणि जर त्यांनी नाराजीचा, नावडल्याचा सूर काढला तर त्यांना कलेची कदर नाही अशी त्यांची संभावना करायची. २) लिहिणाऱ्यांनी आत्मपरीक्षण आणि अभ्यास करून तळागाळातल्या जनसामान्यांचे जीवन कसे सुकर होईल, याचा वेध घेऊन लिहिण्याचे कसब अंगी बाणण्याचा प्रयत्न करणे. जे काही लिहायचे, ते लिहिताना त्या लिखाणाचे समाजावर काय बरे वाईट परिणाम होतील याचाही थोडाफार विचार करायचा. ज्वलंत विषय हाताळायचे असेल तर शक्य तेवढा त्या विषयाच्या आत खोलवर शिरायचा प्रयत्न करायचा आणि नंतरच लिहायचे. ]**

श्याम्या म्हणजे एक रोखठोक आणि सरळसोट स्वभावाचा मनुष्य. मनात येईल तसे बेधडक व्यक्त होणे, हे त्याचे गुणवैशिष्ट्य. कणाकणातून ज्ञानार्जन करण्यासाठी त्याचा सदैव प्रयत्न चाललेला असतो आणि तरीही वाचनाच्या बाबतीत श्याम्या मात्र फारच अभागी मनुष्य आहे असे मला वाटते. अभागी या अर्थाने की साहित्यिक क्षेत्रात विपुल साहित्य उपलब्ध असूनही ते जास्तीत जास्त वाचण्याचे भाग्य त्याला फारसे लाभले नाही. कधी आर्थिक स्थितीमुळे पुस्तके विकत न घेऊ शकल्यामुळे तर कधी भौगोलिक स्थितीमुळे त्याच्या संचारप्रदेशात पुस्तके उपलब्ध नसल्यामुळे असे घडले असावे.

पण हे सत्य असले तरी मात्र पूर्णसत्य नाही.

खरे हे आहे की, त्याला एक आजार आहे आणि तो आजार दिवसेंदिवस वाढत चालला आहे. उजव्या हाताने जेवण करताना डाव्या हातात पुस्तक घेऊन वाचता-वाचताच जेवण करताना किंवा समोरच्या माणसाशी बोलत असतानासुद्धा त्याची नजर पुस्तकावरच खिळून असल्याचेही मी अनेकदा बघितले आहे. त्याला वाचायला खूप आवडतं, खूपखूप आवडतं. विषयाचेही बंधन नाही, काहीही आवडतं. कथा, कादंबरी, कविता, गझल, लावणीपासून ते हिंदी उपन्यास वगैरे वगैरे... कशाचे काहीही बंधन नाही.

पण हाती घेतलेले पुस्तक त्याने शेवटापर्यंत वाचून काढले, असे मात्र फारसे घडत नाही. कधी कधी तो पुस्तक घेतो, वाचायला सुरुवात करतोय; पण काही पाने वाचून झाली की, त्याला असे वाटते की हे वास्तव नाहीच. या देशातल्या ७० टक्के जनतेचे हे चित्रण नसून या लेखाचा जनसामान्याच्या दैनंदिन जीवनाशी काहीही संबंध नाहीये. मग यात वेळ खर्ची घालून अनावश्यक काडीकचरा डोक्यात कोंबण्यात काय हशील आहे? तो असा विचार करतो आणि पुस्तक फेकून देतो.


गंगाधर मुटे

कधी कधी तो पुस्तक घेतो, वाचायला सुरुवात करतोय पण काही पाने वाचून झाले की, त्याला असे वाटते की ज्या लेखकाने हे लिहिलेय तो लेखक, त्या लेखकाचे व्यक्तिमत्त्व आणि आचरण त्या लेखात मांडलेल्या विचारांशी, भूमिकेशी प्रामाणिक किंवा सुसंगत नाही. मग जो विचार, भूमिका स्वतः लेखकाला जगता येत नाही त्या विचाराला, विचार तरी कसे म्हणावे? थोडा वेळ उत्तर शोधतो आणि उबग आल्यागत पुस्तक फेकून देतो.

तसे त्याला बालकवींची श्रावणमासी ही कविता फार आवडते कारण त्यात जे श्रावण महिन्याचे वर्णन आले ना, ती केवळ कविकल्पना नसून त्या कवितेतला अद्भूत आनंद त्याला श्रावण महिना सुरू झाला की प्रत्यक्षात अनुभवायला मिळतो.

*सरसर येते क्षणांत शिरवे,*
*क्षणांत फिरूनी ऊन पडे*

किंवा

*झालासा सूर्यास्त वाटतो सांज अहाहा! तो उघडे*
*तरुशिखरांवर, उंच घरांवर पिवळेपिवळे ऊन पडे*

हे दृश्य केवळ श्रावण महिन्यातच पाहायला मिळते. इतर महिन्यात नाहीच.

कवी, कविता आणि श्रावणमास एकमेकांशी एवढे एकरूप झालेत, की त्यांना वेगवेगळे नाहीच करता येणार. त्याला असे वाटते की, कवीने खूप परिश्रम घेतले असणार ही कविता लिहिण्यावर. संपूर्ण श्रावणमासाचे अवलोकन केले असणार, अभ्यास केला असणार आणि कवी श्रावणमासाशी तद्रूप झाला असणार, तेव्हा कुठे ही कविता आकारास आली असावी. कविता लिहून झाल्यावर एवढा प्रदीर्घ काळ लोटला; पण अजूनही श्रावण महिना त्याच कवितेचे अनुसरण करतो आणि तसाच वागतो जसे कवितेत लिहिले आहे.

याउलट ना. धों. महानोरांची या नभाने भुईला दान द्यावे ही कविता तर सर्वांची आवडती कविता. उत्तुंग लोकप्रियता लाभलेली पण श्याम्याला नाहीच आवडत.

तो समर्थनार्थ जे पुरावे सादर करतो तेही जगावेगळे.

त्याच्या मते नभाने भुईला नेहमीच दान दिलेले आहे आणि भुईला दिलेल्या दानावर नभ अजूनही ठाम व प्रामाणिक आहे म्हणून तर ही सजीवसृष्टी टिकून आहे. देशाची लोकसंख्या चमत्कारिक गतीने वाढत असतानाही सर्वांना पोटभरून खायला पुरेल आणि सडायलाही शिल्लक

साठा उरेल एवढे मुबलक अन्नधान्य या देशात पिकते. नभाचे दान आहे म्हणूनच असे घडते ना?

मग अतिरिक्त दानाची मागणी करणे याचा अर्थ मातीतून अधिक भरघोस उत्पन्न निघावे अशी अपेक्षा असणार. मग समजा नभाने या अतिरिक्त दानाची आराधना स्वीकारली, भरमसाट उत्पादन आले आणि जोंधळ्याच्या ताटाला कणसांऐवजी चांदणे, सूर्य आणि चंद्र जरी जखडलेत तरी त्याने काय घडणार आहे, असा श्याम्याचा सवाल आहे. कवीने ज्या शेतकरी समाजाच्या भल्यासाठी हे अतिरिक्त दान मागितले, त्या शेतकऱ्याच्या पदरात काय पडणार आहे? हाच लाखमोलाचा प्रश्न आहे, असे त्याला वाटते. शेतीमध्ये जोंधळ्याच्या ताटाला कणसांऐवजी चांदणे, सूर्य आणि चंद्र जखडायला लागल्याबरोबर प्रचलित व्यवस्थेनुसार कोणतेही सरकार चांदणे, सूर्य आणि चंद्राकडे शेतमाल याच दृष्टिकोनातून बघणार, अतिरिक्त उत्पादन येऊनही ग्राहकासाठी शेतमाल स्वस्तात उपलब्ध झाला पाहिजे या धोरणात्मक निर्णयाच्या अनुषंगाने निर्यातबंदी लादणार आणि या सूर्य, चंद्र ताऱ्यांना कांदाभजी किंवा आलुबोंडा यापेक्षा जास्त भाव मिळणार नाही याची पुरेपूर व्यवस्था करणार. कदाचित शासन रेशनकार्डावर अनुदानित किमतीत सूर्य, चंद्र तारे उपलब्ध करून देईल. त्यामुळे गल्लोगल्लीत, कचरापेटीत व नालीच्या प्रवाहात सूर्य, चंद्र, तारकांचे ढिगारे साचलेले दिसतील. त्यामुळे मुबलक पिकण्याचे आणि जोंधळ्याच्या ताटाला कणसांऐवजी चांदणे, सूर्य आणि चंद्र लागण्याचे कवीचे स्वप्न साकार होईल.

पण ज्या शेतकऱ्यांसाठी हिरीरीने एवढे मोठे दान मागितले त्याच्या पदरात काय पडणार आहे? शेतात सूर्य, चंद्र, तारे पिकवूनही ते जर मातीमोल भावानेच खपणार असेल तर त्याची दरिद्री आहे तशीच राहणार आहे, सूर्यप्रकाशाएवढे स्पष्ट आहे. त्या ऐवजी कवीने या नभाने सरकारला अक्कलदान द्यावे, विजेच्या लखलखाटाने सरकारचे डोके ठिकाणावर यावे, जेणेकरून शेतकऱ्यांच्या दारापर्यंत विकाससूर्य पोहचेल अशी मागणी करणे जास्त संयुक्तिक नसते का ठरले? त्यातल्या त्यात कवी बिगर शेतकरी असता तर श्याम्याची अजिबात हरकत नव्हती. पण कवी दस्तूरखुद्द शेतकरी असल्याने ही बाब जास्तच गंभीर आहे, असे त्याला वाटते आणि असे त्याला वाटले की तो डाव्याहातचे पुस्तक तो उजव्या हातात घेतो आणि फेकून देतो.

काळ्या(काया) मातीत मातीत ही किती सुंदर कविता. महाराष्ट्रभर गाजलेली. सिनेमावाल्यांनादेखील भुरळ पाडून त्यांना त्यांच्या सिनेमात समावेश करण्यास भाग पाडणारी.

पण श्याम्याला भुरळ पडेल तर तो श्याम्या कसला? त्याच्या मते विठ्ठल वाघांसारखे शेतकऱ्याच्या घरात जन्मलेले शेतकरीपुत्र कवी, शेतकऱ्यांच्या वेदना विकून मोठे कवी/साहित्यिक वगैरे झालेत, धन मिळवले, मान मिळवला; पण शेतकऱ्यांच्या पायातून सांडणारे लाल रगत (रक्त) थोडेफार थांबावे आणि कवीला (श्याम्याला देखील) पडलेले हिरवे सपान (स्वप्न) प्रत्यक्षात खरे होऊन शेतकऱ्याचा घरात आनंदीआनंद नांदावा यासाठी पुढे मग कवीने काहीच प्रयत्न केले नाहीत. ज्या सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणांमुळे ही परिस्थिती उद्‌भवते, त्या सरकारशी दोन हात करून शेतकऱ्यांचे प्रश्न खंबीरपणे मांडण्याऐवजी सरकारकडून जेवढा काही लाभ उपटता येईल तेवढा उपटण्यातच धन्यता मानली. त्याला हा चक्क बेगडीपणा वाटतो आणि असे त्याला वाटले की तो हातातले पुस्तक कपाळावर मारून घेतो आणि दूर भिरकावून देतो.

मात्र श्याम्याचे तर्कशास्त्र विचित्र असले तरी तो त्याच्या समर्थनार्थ युक्तिवाद करतो, तो मात्र खरेच बिनतोड असतो.

मी त्याला एकदा म्हटले की, शाम्या तुला कलेचा आस्वाद घेताना त्यातील उपयुक्ततेचाच शोध घेण्याची सवय जडली आहे. कलेचा पैस किती मोठा असू शकतो याचा तुला अंदाज आलेला नाही. अरे Rita Mae Brown यांनी असे म्हटलेय की "Art is moral passion married to entertainment. Moral passion without entertainment is propaganda, and entertainment without moral passion is television." त्यामुळे तुला कलेचा आस्वाद घेण्यासाठी तुझे मन मोठे करण्याची गरज आहे!

त्यावर शाम्या उसळलाच आणि म्हणाला की कलेचा पैस किती मोठा असू शकतो याचा मला अंदाज आलेला नाही, असे मोघमपणे म्हणता येणार नाही. तसे असते तर मी पुस्तकाला हातच लावला नसता. माझे मूळ दुःख, या देशातल्या सत्तर टक्क्यांपेक्षा जास्त असलेल्या आम जनतेचे साहित्यामध्ये विपरीत उमटणारे प्रतिबिंब, त्यांच्या समस्यांची सोडवणूक होण्यापेक्षा गुंतागुंत वाढविणारा आशय, त्यांच्या समस्यांकडे इतरांनी पाहण्याचा दूषित दृष्टिकोन, त्यात आढळणारा बेगडीपणा यात दडलेले असावे कदाचित.

श्याम्याच्या मते लेखनासाठी दोन पर्याय असू शकतात.

१) लिहिणाऱ्याने वाटेल तसे लिहीत राहायचे, ते इतरांवर लादत राहायचे आणि जर त्यांनी नाराजीचा, नावडल्याचा सूर काढला तर त्यांना कलेची कदर नाही अशी त्यांची संभावना करायची.

२) लिहिणाऱ्यांनी आत्मपरीक्षण आणि अभ्यास करून तळागाळातल्या जनसामान्यांचे जीवन कसे सुकर होईल, याचा वेध घेऊन लिहिण्याचे कसब अंगी बाणण्याचा प्रयत्न करणे. जे काही लिहायचे, ते लिहिताना त्या लिखाणाचे समाजावर काय बरे वाईट परिणाम होतील याचाही थोडाफार विचार करायचा. ज्वलंत विषय हाताळायचे असेल तर शक्य तेवढा त्या विषयाच्या आत खोलवर शिरायचा प्रयत्न करायचा आणि नंतरच लिहायचे.

दोनपैकी तुलनेत पहिलाच पर्याय सोयीचा व विनाकष्टाचा असल्यानेच कदाचित अनादीकाळापासून हाच मार्ग अवलंबला जात असावा, असे श्याम्याचे मत आहे.

शाम्याच्या विचारांना काही लोक एकांगी मानतात; पण शाम्याला हे मान्य नाही. याउलट भारतासारख्या कृषीप्रधान देशात शेतकऱ्यांच्या जीवनमरणाच्या प्रश्नांना बगल देऊन केलेले लेखन किंवा सरकारची मर्जी राखण्यासाठी धडपड करून जाणीवपूर्वक केलेले लेखनच एकांगी मानायला हवे असे शाम्याचे आग्रही मत आहे आणि म्हणून जेथे संधी मिळेल तेथे त्याचं सदैव एकच आणि एवढंच तूणतुणं वाजत असते.

त्यातूनच त्याला बिमारी जडली.

नको तसा विचार करणे आणि त्याचा राग पुस्तकावर काढणे.

या प्रकाराला कुठला आजार किंवा विकार म्हणावे बरे?

**गंगाधर मुटे**

आर्वी छोटी - ४४२३०७, तह. हिंगणघाट, जि. वर्धा.

gangadharmute@gmail.com

मो. ९७३०५८२००४

■■

# सपनों की ताकत

**[ जैसे ही हम किसी बीज को जमीन में डालते है, हम बारीश का इंतजार करते है. यदि दो चार दिन भी उपर से पानी नहीं गिरा तो जमीन और आकाश की शुष्कता उस बीज को नष्ट कर देती है. उपर से बरसता पानी धरा के कण कण तक पहुँचता है और उस बीज के उज्ज्वल भविष्य के लिये सृजन के सभी क्षेत्रों से समर्थन माँगता है. उसी पानी के कारण धरा की उर्जा, आकाश की उर्जा और ब्रम्हांड में मौजूद प्राणों की उर्जा जागने लगती है और उस छोटे से बीज को समर्थन और प्रेरणा देने के लिये आगे आने लगती है. ]**

*'जब भी आप कुछ चाहते है, सारा आलम आपको उस तक पहुँचाने में सहायता करना शुरू कर देता है.'* - **पाऊलो कोहेलो**

## सपनों का भी व्यक्तित्व होता है

सपनो का अपना व्यक्तित्व होता है, अपने मित्र, अपने शत्रु होते है. वे आवारा और उदंड बच्चों के जैसे होते है. वे जगह बदलते है, आकार बदलते है और अपनी असीम उर्जा से भविष्य को बदल कर रख देते है. एक बार आपके मष्तिष्क से बाहर निकलने के पश्चात वे अपनी स्वतंत्र यात्रा पर निकल चलते है. एक दिन हर एक सपना, अपने ही दृष्टा से अलग हो जाता है. सपने की अपनी यात्रा शुरू हो जाती है, दृष्टा की अपनी. इसीलिये कई विचार, जो आरंभ में काफी छोटी महत्वाकांक्षा को सामने रखकर शुरू हुये, बाद में करोड़ो लोगों की जिंदगी को प्रभावित करने मे सफल रहे.

विश्व के सबसे धनवान उद्योगपति माईक्रोसॉफ्ट के प्रमुख बिल गेट्स अपने ही कंम्प्यूटर साफ्टवेअर के नित नये नये उपयोग देख कर खुद हैरान है. जिन कार्यो के लिये उन्होंने यह साफ्टवेअर बनाया था, आज उस कार्य से कई गुना ज्यादा इसका उपयोग उन कार्यो के लिये हो रहा है, जिसकी कल्पना भी उन्होंने नहीं की थी. आज कंम्प्यूटर पर एनीमेशन फिल्में बनती है, भविष्यवक्ता भविष्य बताते है, मौसम विभाग किसानों को मौसम की जानकारियाँ देता है, शेअर बाजार की उठाइटक नापी जाती है. सड़क, रेल्वे, और विमान सेवाओं के आरक्षण किये जाते है. युवा अपने साथी ढूँढते है, कलाकार और लेखक अपने प्रशंसको से मिलते है. सारी दुनिया प्रेम और नफरत फैलाने के लिये इनका उपयोग करती है. मध्यपूर्व के खाड़ी के देशों में हुई रक्तहीन क्रांति का श्रेय भी आज इसी तकनीक को दिया जा रहा है. कागजविहीन दुनिया की ओर बढ़ते हुए कंम्प्यूटर ने दुनिया के लाखों हेक्टर में फैले जंगलों का कटने से बचा लिया है. आज कंम्प्यूटर, संचार और मनोरंजन उद्योग की सबसे मजबूत ताकत बन चुका है. बिल गेट्स ने तो सपना देखा था केवल टायपिंग मशीन और टेलीफोन के विकल्प बनने का, किंतु आज उनके साफ्टवेअर हमारी रगों में बहते लहू के समान प्रत्येक कार्यालय या व्यापार के लिये कर्मचारियों से भी ज्यादा जरूरी हो चुके है. दुनिया के तमाम देशों, नदियों, पहाड़ों और महासागरों की सीमाओं को अर्थहीन बनाते हुए, आज उनके कम्प्यूटर एक नयी वैश्विक संस्कृति का निर्माण कर रहे हैं.

एक सफल और असफल व्यक्ति के बीच का सबसे बड़ा अंतर केवल उनके सपनों की गुणवत्ता या स्तर का ही होता है. जानवरों को सिर्फ भोजन या मैथुन के सपने आते है, नतीजतन वे सारा जीवन इन्हीं दो आवश्यकताओं की परिक्रमा करते रहते है. एक महान समाज या देश, महान सपने देखने वालो के बलबूते ही बनता है. इसलिये अपने आपको कभी भूल कर भी किसी औसत सपने का गुलाम मत बनाईये. औसत सपने, औसत मित्रों की तरह हमारी सारी जीवन उर्जा को सोख लेते है, जीवन के शुरूआती दौर में समूचे रचनातंत्र को समझने के लिये किसी औसत स्थान पर रूक जाना माफ किया जा सकता किंतु किसी औसत जीवन उद्देश्य के लिये अपनी समूची प्रतिभा का बलिदान कर देना, उस अनादि अनंत ईश्वर के पुरस्कारों को ठुकराने के समान है. सपने ईश्वर के देश के राजदूत बनकर हमसे मिलने आते है, हम उन्हें कहाँ बिठाते है, उनकी कितनी आवभगत करते है, बस इसी बात से हमारा सारा भविष्य तय हो जाता है.



**ॲड. दिनेश शर्मा**

भारत की प्रसिद्ध शेअर ब्रोकर कंपनी शेअरखान की सालाना ब्राँच मीट में कंपनी के वाईस प्रेसीडेंट जयदीप अरोरा अपना भाषण दे रहे थे. वे बता रहे थे कि वर्ष २००२ में जब कंपनी ने भारतीय शेअरबाजार में अपना पहला कदम रखा तब उनकी टीम का सपना था कि आनेवाले एक दशक में वे पचास हजार निवेशकों को अपना ग्राहक बनायेंगे और सालाना दस करोड़ रूपये का मुनाफा कमायेंगे. २४ मई २०१० को जब समूचे देश से वहाँ पहुँचे तीन सौ से ज्यादा शाखाप्रमुखों के सामने वे संबोधन देने के लिये खड़े थे, कंपनी लगभग १२ लाख निवेशकों को अपनी ओर आकर्षित कर चुकी थी और उसका सालाना लाभ ११५ करोड़ रूपये के आँकड़े को पार कर चुका था. एक दशक से भी कम समय में कंपनी अपने तयशुदा सपने से मीलों दूर निकल चुकी थी.

केवल सात घरेलु महिलाओं का छोटा सा सपना, नारी सशक्तिकरण के कितने बड़े उद्यम को जन्म दे सकता है, इसका लिज्जत पापड़ से बड़ा और कौन सा उदाहरण हो सकता है? १५ मार्च १९५९ को लोहाना निवास, गिरगाँव, मुंबई की, अत्यंत साधारण आर्थिक परिस्थिती वाली सात घरेलु महिलाओं ने, अपनी ही ईमारत की छत पर, पापड़ बनाकर बेचने का काम शुरू किया. इस कार्य के लिये, मुंबई के एक समाज सेवक, श्री छगनलाल करमसी पारेख से ८० रूपये उधार लिये गये. तीन महिने के भीतर ही, पापड़ बनाने का काम करने वाली महिलाओं की संख्या बढ़कर २५ हो गई. दो साल के भीतर काम करनेवाली महिलाओं की संख्या बढकर १५० और तीसरे साल में ३०० हो गई. १९६१ में श्रीमती रमाबेन रूपारेल ने उस पापड़ का नाम सुझाया, लिज्जत पापड़, और आज लिज्जत यह नाम, भारतीय रसोईघरों, होटलों और विवाह आयोजनों में, भारतीय खाने के मेनू का, एक अनिवार्य सदस्य बन चुका है. आज लिज्जत पापड़ बनानेवाली सहकारी संस्था, श्री महिला गृह उद्योग, देश के कई शहरों में, अपनी ७० से ज्यादा शाखाओं के माध्यम से, ५० हजार महिलाओं को रोजगार दे रही है और सालाना ५०० करोड़ रूपये का कारोबार कर रही है.

इस गलतफहमी में मत रहिये कि आपके सपने सबसे सुविधाजनक स्थान पर ही आपसे मिलेंगे. यह भी संभव है कि जहाँ सबसे ज्यादा संकट हो वहीं कोई सपना आपके इंतजार में हो. भारत के महान उद्यमी नारायण मूर्ति अपनी जवानी के दिनों में समाजवादी विचारों से काफी प्रभावित थे. वर्ष १९७४ में एक बार वे बल्गेरिया में ट्रेन से यात्रा कर रहे थे. उस दौर में बल्गेरिया साम्यवादी शासकों की लौह गिरफ्त में था, जहाँ प्रत्येक व्यक्ति की बातचीत पर पुलिस का पहरा था. ट्रेन में सहयोगी यात्रियों के साथ नारायण मूर्ति के वार्तालाप का गलत मतलब निकाल कर बल्गेरिया की पुलिस ने उन्हें गिरफ्तार कर लिया. ७२ घंटों तक वे भूखप्यासे उनकी कैद में रहे. चूँकि वे भारतीय नागरिक थे और भारत, समाजवादी देशों का मित्र राष्ट्र माना जाता था, उन्हें ७२ घंटो के बाद छोड़ दिया गया.

भूख प्यास से भरी उस अपमानजनक कैद में नारायण मूर्ति संपूर्ण रूप से बदल गये. समाजवादी राष्ट्रों की स्वतंत्रता विरोधी जीवन शैली ने उनके भीतर के समाजवादी युवा का आकस्मिक अंत कर दिया और उसके स्थान पर एक दृढ़ इरादों वाले राष्ट्रप्रेमी उद्योगपति का जन्म हुआ. भूख प्यास से भरी उस अपमानजनक कैद में उन्के मष्तिष्क में एक सपने ने जन्म लिया. सपना था भारत को सूचना क्रांति के क्षेत्र में विश्व की महाशक्ति बनाने का. वे भारत लौटे और अपनी पत्नि सुधा मूर्ति से बीस हजार रूपये उधार लेकर, १९८१ में, उन्होंने अपने ६ मित्रों के साथ इंफोसीस की स्थापना की. अपने ही घर के पोर्टिकों में कंपनी का दफ्तर खोला गया. अगले एक दशक में इस टीम ने भारत को सूचनाक्राँति और ज्ञान आधारित अर्थव्यवस्था के क्षेत्र में विश्व की अग्रणी ताकत बना दिया. १९९० के दशक में इंफोसीस की सफलता ने भारतीय शेअरबाजार को नयी उंचाईयाँ प्रदान की और एक समय तो ऐसा भी आया कि वे एशिया के सबसे धनवान व्यक्ति बन गये. वे व्यापार और उद्योग के क्षेत्र में तेजी से उभर रही नयी पिढ़ी के नये हिरो बने और उनका नाम भारत के संभावित राष्ट्रपति के उम्मीदवारों की दौड़ में शामिल रहा. सम्मान और सफलता के शिखर पर आज नारायण मूर्ति उन बल्गेरियन गार्ड के प्रति धन्यवाद के भाव से भरे हुए है, जिनकी कैद में एक महान सपने ने जन्म लेकर लाखों भारतीयों को जिंदगी को सदा के लिये बदल दिया.

## प्रत्येक सपना पूर्ण होने के लिये ही जन्मा है

सपनों की इस प्रखर उर्जा का जिक्र भारत के भूतपूर्व राष्ट्रपति अब्दुल कलाम अक्सर नौजवानों को दिये अपने भाषणों में करते हैं. वे, अपनी युवावस्था में भारतीय हवाई सेना में शामिल होकर पायलट बनना चाहते थे. देहरादून में हुये एक इंटरव्यू में उनका चयन नहीं हो सका और वे भीतर से पूरीतरह टूट गये. अत्यंत निराश और विचलित मनस्थिति में, कलाम ऋषीकेश में गंगा स्नान करने गये. पानी में डुबकी लगाकर जब ऊपर उठे तो सामने दूर पहाड़ों पर उन्हें एक आश्रम दिखाई दिया. बेचैन मन शातिं की तलाश में था अतः: उनके कदम उस आश्रम की ओर उठते चले गये. वह आश्रम था स्वामी शिवानंद का. कलाम को देखते ही स्वामी शिवानंद ने उनके भीतर के तूफानों का अंदाजा लगा लिया. इस मुलाकात ने, अब्दुल कलाम के जीवन को समग्र रूप से रूपांतरित कर दिया. स्वयं अब्दुल कलाम लिखते है. स्वामीजी नें उन्हे कहा थाः

सपने, जब हृदय में जूनून के साथ बहने लगते है, जब वें शुद्ध एवँ गहरे हो, विद्युतचुंबकीय उर्जा धारण कर लेते है. प्रत्येक रात, जब हमारा मस्तिष्क सुप्त अवस्था में होता है, यह उर्जा, ब्रम्हांड में उत्सर्जित हो जाती है. हर सुबह, यही उर्जा, ब्रम्हांडीय लहरों में अभिषिक्त होकर, हमारी चेतना में वापस लौट आती है. जो भी सपना देखा गया है, वह निश्चित रूप से, हर हाल में, वास्तविकता में अभिव्यक्त होता है.

नवयुवक! अपने भाग्य को स्वीकार करो और आगे बढ़ो. तुम्हारा जन्म पायलट बनने के लिये नहीं हुआ है. बल्कि जो तुम बनने वाले हो, वो भले ही आज जाहिर न हो, किंतु वह पूर्वनिश्चित है. असफलता को भूलो, क्योंकि वह, तुम्हें तुम्हारे निर्धारित पथ तक पहुँचाने के लिये आवश्यक थी. अपने अस्तित्व के वास्तविक कारण की खोज करो, अपने आपसे एकरूप हो.

**मेरे पुत्र, स्वयं को ईश्वर की ईच्छा के सामने समर्पित कर दो**

आकस्मिक रूप से स्वामी शिवानंद से हुई इस मुलाकात ने

अब्दुल कलाम को अपने सपनों के साथ, अपने हृदय और मस्तिष्क की समूची उर्जा का समन्वय करने के लिये प्रेरित कर दिया. निराश मनस्थिति में आश्रम में गये कलाम, मानो उर्जास्नान करके वहाँ से लौटें. अगले कुछ वर्षों में उन्हें देश की जानी मानी संस्था इसरो में देश के महान वैज्ञानिकों के साथ कार्य करने का अवसर मिला. जिंदगी के अनेकानेक पड़ावों को पार करते हुए कलाम भारतीय परमाणु शक्ति का विकास करने वाली टीम के प्रमुख बन गये. सारा देश उस दिन गर्व से झूम उठा था जब वे भारत के ग्यारहवें राष्ट्रपति के रूप में राष्ट्रपति भवन के केंद्रीय कक्ष में शपथ ले रहे थे.

सभी धर्मो के पौराणिक चरित्र और आधुनिक दौर के कॉमिक्स के पात्र हमारे बचपन में हमारे भीतर यह विश्वास पैदा करते है कि कुछ भी असंभव नहीं है. आदमी उड़ सकता है, गायब हो सकता है, दूर बैठे मित्रों या रिश्तेदारों से संपर्क स्थापित कर सकता है, जिन को बोतल से बाहर निकालकर अपनी ईच्छाओं का गुलाम बना सकता है. ये तमाम कल्पनायें मनुष्य के मष्तिष्क को प्रेरीत करने के लिये रची या गढ़ी गई है. ये हमारे सपनों को जन्म देती है और असंभव को संभव बनाने का विश्वास पैदा करती है. जो समाज या जाति इन पर विश्वास करते हुए सपने देखती है, वही अपने दौर का नियम कानून तय करती है. आज के हमारे सभी वैज्ञानिक अविष्कारों के जन्म के पिछे इन्हीं कल्पनाओं की सबसे बड़ी भूमिका रही है. आस्तिक वे नहीं है जो अपनी छोटी छोटी मजबूरियों की लंबी सूची लेकर रोज भगवान से मिलते है और मंदिर की घंटिया बजा बजा कर ईश्वर को याद दिलाते है कि उसके निजाम में क्या क्या कमियाँ रह गई है, बल्कि आस्तिक तो वे है जो चमत्कारों में विश्वास करते है और सपनों को पूरा करने के लिये निकल पड़ते है. उनकी आँखो से ईश्वर देखता है, उनके कदमों से ईश्वर आगे बड़ता है और इसी ताकत के बलबूते प्रत्येक मंजिल स्वयं होकर उनके सामने सर झुका कर खड़ी हो जाती है.

महाराष्ट्र के प्रसिद्ध नाटककार, गीतकार, लेखक, वक्ता, फिल्मनिर्माता, शिक्षाशास्त्री, राजनैतिक विचारक और भी ना जाने किन किन नामों या उपाधियों से विभूषित और लोकप्रिय श्री प्रल्हाद केशव अत्रे का जीवन हमारे मष्तिष्क में उभरने वाले प्रत्येक सपने की पूर्ति को अनजान क्षेत्रों से मिले महानतम समर्थन का लाजवाब उदाहरण है. अपनी प्रसिद्ध आत्मकथा मी कसा झालो(मैं कैसे बना) में उन्होंने अपने प्रत्येक सपने के चमत्कारी प्रवास का रोमांचक, बेहद मनोरंजक, और प्रेरणादायी विवरण दिया है. महाराष्ट्र के पूना जिले के एक सूदूर देहात में अत्यंत गरीब परिवार में जन्म लेकर महाराष्ट्रीयन कला संस्कृति और अस्मिता के प्रमुख निर्माताओं में शामिल होने की उनकी यात्रा, विश्व के प्रत्येक भूभाग में घटित होनेवाले ऐसे ही चमत्कारों की एक कड़ी है. प्रत्येक क्षेत्र में वे प्राथमिक विद्यालय के एक घबराये हुए बच्चे के जैसे प्रविष्ट होते रहे और उस क्षेत्र के कुलपति वाली छाप छोडकर वहाँ से बाहर निकलते रहे. उन्होंने जो कुछ भी किया, जी खोलकर किया. हर सफलता के कुछ पहले वे असफलता और अंधकार के गहन कूप में पहुँच जाते, किंतु नियति मानो हर बार उन्हें आश्चर्य के धक्के देकर प्रकाश की ओर फेंक देती. जब जब ऐसा लगता कि अब सब कुछ नष्ट हो चुका है तब तब वे चमत्कारिक रूप से शिखर पर पाये जाते. हर अपमान ने उन्हें सम्मान का वरदान दिया, हर असफलता मानो उनको सही रास्ते पर लाने के लिये आती रही.

वे अपने भाषणों और जीवन से बार बार सभी को प्रेरित करते रहे कि सपने देखिए, सपने पूरे होते है.

विश्वास रखिये, जो कुछ भी सोचा या कल्पित किया गया है, वह ब्रम्हांड के किसी न किसी समय अंतराल या अवकाश में जन्म ले चुका है. इस भूल के साथ मत रह जाना कि आप ही सपने देख रहे है बल्कि सत्य तो यह है कि आपके सपने भी आपको पुकार रहे है, आपकी ओर बढ़ रहे है. जिसतरह अच्छे मस्तिष्क, अच्छे सपनों की तलाश मे रहते है, उसी तरह अच्छे सपने भी, उपजाऊ मस्तिष्क की तलाश में दिनरात भटकते रहते है. एक ही सपना, एक ही समय बिंदु पर, हजारों मस्तिष्क में प्रतिबिंबित होता है. जो सबसे उर्वर मस्तिष्क होते है, वे उन्हें वास्तविकता में बदल देते है. जो सपना आप देख रहे है उसे यदि आप पूरा नहीं करेंगे तो ईश्वर उसे पूरा करने के लिये दूसरे ज्यादा काबिल व्यक्ति को खोज लेगा. इसलिये बेहतर यही होगा कि ईश्वर की इस अनुकंपा के लिये आप स्वयं को ही प्रस्तुत करें. आपके सपने आने वाली पिढ़ीयों को दी गई आपकी सबसे किमती भेँट है.

## साधू या डाकू कुछ भी बनना पर महान बनना

एक महान पालक वह नहीं है जो अपने बच्चों के सुरक्षित जीवन के लिये दिनरात मेहनत करें और ढेर सारी संपत्ति उनके लिये विरासत में छोड़ कर जाये, बल्कि महान तो वे है जो अपने सामान्य जीवन की जद्दोजहद के बीच भी अपने बच्चों के मनोमष्तिष्क में महान सपनों के बीज बोते रहे और सतत इस बात की देखरेख करे कि कोई सपनों के उन पौधों को कुचल ना डाले. एक महान सपने से ज्यादा किमती कोई विरासत नहीं होती. मुफ्त की संपत्तियाँ तो उर्जा को सोख लेती है और बच्चों को असमय बूढ़ा और झगड़ालु बना देती है जबकि बेहतरीन सपने हमारे बच्चों की उर्जा को उत्तेजित करते है, उन्हें उत्साह से भरते है और उन्हें उदार बना देते है.

महाराष्ट्र के प्रसिद्ध अर्थशास्त्री, पूना विश्वविद्यालय के उपकुलपति और योजना आयोग के सदस्य, डॉ. नरेंद्र जाधव ने अपने अनपढ़ पिता के जीवन पर एक पुस्तक, आमचा बाप आणि आम्ही लिखकर उन्हें श्रद्धांजली दी है. उस मामूली से दिखने वाले लकड़हारे पिता ने नरेंद्र के मनोमष्तिष्क में बचपन में एक ही बात ठूँस ठूँस कर भर दी थी कि तुम्हे जो कुछ भी बनना है, बड़ा ही बनना है, चाहे तुम साधु बनना या डाकूबनना. नतीजतन एक बेहद गरीब परिवार में जन्म लेकर भी नरेंद्र जाधव और उनके भाई बहन अपने अपने क्षेत्र में शिखर पर पहुँचे. अमेरिका में अर्थशास्त्र में डाक्टरेट हासील करने के बाद भी नरेंद्र जाधव सभी को आश्चर्य का धक्का देते हुए भारत लौट आये और अपने ज्ञान और प्रतिभा से मातृभूमि की सेवा में जुट गये. वे आज एक बेहतरीन वक्ता, लेखक और शिक्षाशास्त्री के रूप में सारे देश में सम्मान से देखे जाते है. उनके प्रेरणादायी भाषण सुनने के लिये लोग हजारों की तादाद में जुटते है. भारत के प्रधानमंत्री डॉ मनमोहनसिंह तो उन्हें देश की दलित और शोषित जनता के रोल मॉडल के रूप में इज्जत से देखते है.

## एक मासूम बालिका का लेखिका बनने का स्वप्न

एक मासूम बालिका के लेखिका बनने के सपने को, दूसरे विश्वयुद्ध के तेजी से बदलते घटनाक्रमों के कारण, जो तेजस्विता

और आयाम मिले, उसने समूची वैश्विक चेतना को हिला कर रख दिया था.

एनी फ्रेंक का जन्म १२ जून १९२९ को जर्मनी के फ्रेंकफर्ट शहर में एक यहूदी परिवार में हुआ था. बचपन से उनके मन में एक अभिनेत्री या लेखिका बनने का सपना था. जर्मनी में हिटलर के जातीय अत्याचारों की शुरूआत होने पर, उनके मातापिता उत्तरी यूरोप के देश, नीदरलैंड के शहर एम्स्टर्डम में रहने चले गये. १९४० में वे लोग उस समय चारों ओर से घिर गये जब जर्मन सेना ने नीदरलैंड को भी अपने कब्जे में ले लिया. जुलै १९४२ में नाजी सेना के अत्याचारों से बचने के लिये, उनका परिवार एक गुप्त स्थान पर रहने चला गया, जहाँ वे दो वर्ष तक रहे. एनी फ्रेंक को बचपन से डायरी लिखने का शौक था. अतः उनके १३ वे जन्मदिन पर उनके पिता ने उन्हे एक डायरी उपहार में दी.

इस बेहद कठिन और आंतकित कर देने वाले समय में, एनी ने, अपने मनोभाव पिता की दी हुई उस डायरी मे अंकित करने शुरू किये. इस डायरी में, यहूदी लोगों पर नाजी सेना के हुये अत्याचारों, उनके पहले प्रेम, मातापिता के प्रति उनके विचार और सबसे बड़ी बात, अमरत्व की अपनी कामना के बारे मे एनी ने विस्तार से लिखा. वे अगस्ट १९४४ तक उस अज्ञातवास में सतत अपनी डायरी लिखती रही.

अगस्ट १९४४ में नाजी सेना ने, उनके छिपने के स्थान पर धावा बोल कर, उनके परिवार को गिरफ्तार कर लिया. सितंबर १९४४ में पिता को और ऑक्टोबर १९४४ में उनकी माँ को, उन दोनो बहनों से अलग कर दिया गया. उनकी माँ भूख से चल बसी. मार्च १९४५ में, नाजी सेना के कब्जे में सोलह वर्ष की एनी फ्रेंक और उनकी बड़ी बहन मार्गोट की कमजोरी, बीमारी और भूख से तड़प कर मृत्यु हो गई. युद्ध की समाप्ति तक केवल उनके पिता ही जीवित बचे. युद्ध के पश्चात जब एनी की खोजबीन की गई तो उनकी वही डायरी खोजकर्ताओं के हाथ लगी.

१९५० में, एनी फ्रेंक की वही डायरी, द डायरी ऑफ ए यंग गर्ल नाम से प्रकाशित हुई. आतंक के साये में पल पल मृत्यू की तरफ बढ़ते हुये जो कुछ भी उसने लिखा, उसका एक एक शब्द, देखते ही देखते, विश्व साहित्य की अनमोल धरोहर बन गया. विश्व की सबसे ताकतवर महाशक्तियों के बीच लड़े गये उस भीषण महायुद्ध में सभी नेताओ से ज्यादा लोकप्रियता एनी फ्रेंक को मिली. अपने लेखिका बनने के सपनो तक जिस अंदाज में वह मासूम बालिका पहुँची वह सारा घटनाक्रम आज मानवीय इतिहास की एक अमर गाथा बन चुका है. आज हिटलर और एनी दोनो ही हमारे बीच में नहीं है. किंतु धरती पर जब तक मानवता जिंदा रहेगी, उसके सपने जिंदा रहेंगे, तब तक एनी फ्रेंक की डायरी हर युग में पढ़ी जाती रहेगी. जून १९९९ में अमेरिका की प्रतिष्ठित पत्रिका टाईम ने, उन्हें, शताब्दी की १०० सबसे प्रभावशाली हस्तियों में शुमार किया.

इस विशाल आकाश के नीचे प्रत्येक बीज में जंगल बन जाने की ताकत है, हर एक बूंद में सागरों को मथ देने जितनी उर्जा है, बारहखड़ी के गिनेचुने अक्षरों में दुनिया के तमाम ग्रंथालयों में समा न सके इतना साहित्य रच देने की ताकत है और हर बच्चे में महाद्वीपों के नक्शें बदल देने की ताकत है. यहाँ कुछ भी सीमित या क्षुद्र नहीं है, केवल विराट की ही सत्ता है. किंतु इस महान सत्ता के असली वारिसदार तो वे ही रहेंगे जो खुद महान सपने देख सकते है और अपनी टीम में सपने देखने का सामर्थ्य पैदा कर सकते है. एक महान नेता वह नहीं है जो खुद तो महान है किंतु जिसके समर्थक सामान्य या औसत सोच से भरे हो, बल्कि महान नेता तो वह है जो सबसे छोटे पात्र के मन में भी किसी भव्य दिव्य सपने की चिंगारी सुलगा दे.

विश्व इतिहास के सबसे महान युद्ध केवल शक्ति और सामर्थ्य के बल पर नहीं लड़े गये है बल्कि वे किसी महान सपने के लिये कुर्बानी का जज्बा रखने वाले स्वप्नदृष्टाओं के जूनून की देन है. हिंदुओं के पवित्र धर्मग्रंथ रामायण में सागर सेतु के निर्माण में एक मामूली गिलहरी के अकिंचन योगदान को प्रभु राम अपने करकमलों के स्पर्श द्वारा स्वीकार कर उसे अमर बना देते है. उस युद्ध में विश्व की सबसे प्रशिक्षित और शक्तिशाली रावण सेना को वानरों और भालूओं ने रौंद डाला था, क्योंकि प्रत्येक सिपाही या सेनानी अपने ही सपनों का पीछा कर रहा था. प्रत्येक सिपाही राम के लिये तो लड़ ही रहा था, अपनी भी दिव्यता की तलाश कर रहा था. राम ने केवल और केवल महान सपनों की इसी उर्जा के बल पर मामूली वनचरों को विश्वविजयी सेना में तब्दील कर दिया था.

## जलीय बनिए, रूक्ष नहीं

जैसे ही हम किसी बीज को जमीन में डालते है, हम बारीश का इंतजार करते है. यदि दो चार दिन भी उपर से पानी नहीं गिरा तो जमीन और आकाश की शुष्कता उस बीज को नष्ट कर देती है. उपर से बरसता पानी धरा के कण कण तक पहुँचता है और उस बीज के उज्वल भविष्य के लिये सृजन के सभी क्षेत्रों से समर्थन माँगता है. उसी पानी के कारण धरा की उर्जा, आकाश की उर्जा और ब्रम्हांड में मौजूद प्राणों की उर्जा जागने लगती है और उस छोटे से बीज को समर्थन और प्रेरणा देने के लिये आगे आने लगती है.

ठीक ऐसा ही कुछ हमारे सपनों के साथ होता है. बहुत ज्यादा अंहकार, स्वभाव की शुष्कता और एकांगीपन हमारे सपनों के दुश्मन बन जाते है. अतः जब भी कोई सपना देखें, जलीय तत्व से भर जाइये. पानी की तासीर नीचे और गहरे उतरने की होती है. ठीक उसीतरह ज्यादा से ज्यादा क्षेत्रों से संपर्क करें. जितना हो सकता है, उतना विनम्र होते चले जाइये. अपने सपनों पर अपनी ही विनम्रता और मित्रता का पानी झमा झम बरसने दें. एक दिन आप पायेंगे कि जीवन की सारी उर्जाएँ आपके सपने पूरे करने के लिये स्वयं आगे आ रही है. हर दिशा से आपको समर्थन मिल रहा है. सारा आलम आपके गौरव गान में शामिल हो चुका है.

**- ॲड. दिनेश शर्मा**
पुलगाँव, जि. वर्धा महाराष्ट्र.
मो. ९३२६८४१९२४
dgsharma07@gmail.com

■■

# आमची नारदीय कीर्तन परंपरा

**[ नारद हे त्यावेळी कोणतेही रूप घेऊ शकत, काहीही करू शकत, कोणत्याही युगात जाऊ शकत म्हणजेच ते आजच्या वर्तमानात आमच्या हातातल्या लेखणीतही असले पाहिजेत. आमच्याही कीर्तनरूपी लेखणीतून काय काय निघेल याची आम्हाला खात्री नसते. खरे सांगायचे झाले तर आम्ही काही दिवसांपूर्वी मध्यस्थ शिरोमणी आणि मध्यवंशीय (?) अमर'शिंग'जी यांचे लेखी संभाषण वर्तमानपत्रातून वाचले, जे संभाषण त्यांच्या दूरध्वनीवरून एका उफाड्याच्या भारबालेला अर्थात बंगालप्रमत्ता बिपाशा हिच्याशी झालेल्या वार्तेचे प्रिंटरूप होते ते वाचून आमच्या शिडशिडीत, काटक देहात हवा भरल्या गेली. आम्हाला फुरफुरून आले, हे फुरफुरणे इतके होते, की त्या वेळी आम्ही एक क्वार्टर एन्डोसल्फान जरी प्राशले असते तर त्या एन्डोसल्फानच्या द्रव्यालाच कॅन्सर झाला असता. ]**

**वैशाखाच्या कृष्णरात्रीला**
**नारद मुनींचा जन्म जाहला**
**बाप कोण हो, माय कोण**
**ती प्रश्न आजही तसाच उरला**

आम्हा कीर्तनकारांनाही परंपरा लाभलेली असते. या परंपरेची सुरुवात नारदमुनींपासून होते. नारदमुनींचा जन्म हा वैशाख महिन्यातल्या कृष्ण पक्षातल्या प्रथम तिथीला येतो. आमच्या परंपरेची सुरुवात आजच्या कीर्तनकाळात झाली आहे याची जाणीव संपूर्ण भारतात हे लेखी कीर्तन लिहिणाऱ्या थंडा महाराजांना आणि या कीर्तनाच्या वाचकरूपी श्रोत्यांनाच आहे. या गादीवरून आम्ही लिहितो याचे आम्हाला भान आहे म्हणूनच आम्हाला कळनंदन, कळविषारद, कळकौतुक या तिन्ही पदव्यांचा लाभ झाला पाहिजेच. आमचे गादी संस्थापकसुद्धा त्यांच्या काळात कळ लावण्यासाठी फार प्रसिद्ध होते असे मानले जाते. त्यांच्या ज्या कळा महत्त्वाच्या मानल्या जातात त्यात देवकीची मुले तू मारून टाक, ही उपदेशवजा कळ जी त्यांनी दानवराज व मामासम्राट कंस महोदयांना केली त्यातून आज अर्थ काढायचा झाला तर एवढाच निघतो, की देवकीला होणाऱ्या मुलींचा हुंडा मुलींचा मामा या नात्याने त्यांनाच द्यावा लागला असता, कारण नवजात मुलींचा बाप हा अत्यंत दरिद्री होता. ही पिडा आधीच नष्ट करावी म्हणून त्याने नारदाचा तो सल्ला स्वीकारला असावा किंवा नारदमुनी हे स्त्रीभ्रूण हत्येस कारणीभूत ठरणारे तत्कालीन वैद्यक अर्थात डॉक्टर अथवा सोनोग्राफी तज्ज्ञ असावेत. नारद हे त्यावेळी कोणतेही रूप घेऊ शकत, काहीही करू शकत, कोणत्याही युगात जाऊ शकत म्हणजेच ते आजच्या वर्तमानात आमच्या हातातल्या लेखणीतही असले पाहिजेत. आमच्याही कीर्तनरूपी लेखणीतून काय काय निघेल याची आम्हाला खात्री नसते. खरे सांगायचे झाले तर आम्ही काही दिवसांपूर्वी मध्यस्थ शिरोमणी आणि मध्यवंशीय (?) अमर'शिंग'जी यांचे लेखी संभाषण वर्तमानपत्रातून वाचले, जे संभाषण त्यांच्या दूरध्वनीवरून एका उफाड्याच्या भारबालेला अर्थात बंगालप्रमत्ता बिपाशा हिच्याशी झालेल्या वार्तेचे प्रिंटरूप होते ते वाचून आमच्या शिडशिडीत, काटक देहात हवा भरल्या गेली. आम्हाला फुरफुरून आले, हे फुरफुरणे इतके होते, की त्या वेळी आम्ही एक क्वार्टर एन्डोसल्फान जरी प्राशले असते तर त्या एन्डोसल्फानच्या द्रव्यालाच कॅन्सर झाला असता. अमरशिंगाच्या बंद किडनी देहात जोर पाहून ते कोणता श्लोक म्हणत असावेत यासाठी आम्ही त्यांच्या शरीरात कायाप्रवेश केला तर हे मनोगत ऐकायला मिळाले,

**सदा सर्वदा भोग तुझा घडावा**
**त्याच कारणी देह माझा पडावा**
**उपेक्षू नको जरी तू अभिनेत्री**
**आपण जागवू चल कैक रात्री**
**विकत प्रेम दे मागणे हेचि आता**
**दलालीत मी काल विकले कलकत्ता**
**जय जय सर्वनेते सत्तार्थ ।।**



**शे.भ.प.** शेती भक्त परायण)
**-'थंडा' महाराज देगलूरकर**



अंग भाजवून टाकणाऱ्या उन्हाळ्यात एका आजारी आणि म्हाताऱ्या दलालाचे कामबोल ऐकून अगदी या काळातील नववधू-वरांनाही प्रचंड घाम फुटला असावा; परंतु अशांना जर संतती झाली तर तिलासुद्धा मेरा बाप कौन?, मेरी माँ कौन? हा प्रश्न पडतो काय हे मोठे कोडे आहे! खरे तर आता एखाद्याने इकडे अमरशिंगाच्या घरी तर तिकडे जॉनरावच्या घरी कलागती लावणे गरजेचे आहे. आपण सारे सामान्य सोडले तर अशा सत्ताधिशांच्या मद आणि मानाचा तर दंभ आणि विद्वेषाचा अतिरेक माजला आहे. सप्तस्वर्गापासून ते सप्तपातळापर्यंत त्यांनी सर्व विकून खाल्लेले आहे. आता ही खरी वेळ आहे ती अनेक नामधारी सत्तासमर्थांच्या गोटात कलहाग्नी पेटवण्याची तर त्यांच्या 'अंतःपुरात' संशयाग्नी चेतवण्याची. यासाठी या मंडळींचा नेमका पिता कोण आहे याची शंका निर्माण करणे गरजेचे आहे. आपल्या अवतीभोवती खरेतर अनेक नारदकुलीन पत्रकार तथा वार्ताहर अथवा बातमीदार विनाकारण पडलेले दिसताहेत. या नारदजयंतीच्या निमित्ताने त्यांच्या कानात भरवले पाहिजे की पाश्चिमात्य देशांना शोध पत्रकारितेसाठी म्हणून आयते शोधलेले विषय पाहिजेत. सर्व वर्तमानपत्राच्या वाचकांचा आवडता विषय हा 'मोठ्यांची लफडी, नेत्यांच्या भानगडी' हाच असतो. आज महागाई इतकी वाढली आहे आणि पेट्रोल इतके महाग आहे, की पळपुटेसुद्धा घरबशे बनले आहेत. या मंडळींना आपोआप ही माहिती द्यावी की तुमच्या भागातला नेता हा कामदुर्बल असून त्याचा आपल्या अपत्याशीही काही संबंध नाही. ही अफवा हळूहळू खरी ठरेल आणि 'वारिस की खोज' या एकाच मोहिमेवर असा नेता आणि त्याचे समर्थक फिरतील. किमान या फिरण्यात त्यांचा भ्रष्टाचार तरी बंद होईल. खरे पाहिले तर या मंडळींना कोणतीही गोष्ट सहकार तत्त्वावर ठेवतात काय याचा शोध घेणे हे ब्रेकींग न्यूज ठरणार आहे. आज आम्हाला आठवण येते ती भगवान विष्णुदेवांची कारण त्यांनी एकदा या तत्कालीन वैश्विक पत्रकार नारदाला स्त्रीरूप घ्यायला लावले होते. त्या स्त्रीरूपाचा श्लोकही आम्हाला ज्ञात आहे. त्यात म्हणले आहे,

**नारदाची केली नारदी**
**केला त्याचा छळ**
**हिच देवाची लीला**
**अशीच काढती कळ**

या श्लोकासारखेच त्यांनी आताच्या नेत्यांबाबत नवा असा श्लोक निर्माण व्हावा अशी परिस्थिती निर्माण केली पाहिजे ज्यात म्हणलेले असावे की,

**नेत्यांना बनवले शिखंडी**
**त्यांना नेसवली साडी**
**लिपस्टीक लावली ओठांना**
**भादरून मिशी अन् दाढी**

ही आजची नारदीय वाणी पुढे कधीतरी निश्चितच खरी ठरणार आहे. मात्र आम्हाला राहून राहून एक प्रश्न या आठवड्यात पडला आहे, की या वर्षी निसर्गाच्या अतिनिद्रेमुळे गेल्या पावसाळ्यात पाऊस पाडणाऱ्या नक्षत्रांची तोटी उघडीच राहिल्याने दुर्दैवाने बऱ्याच भागातील जलानुशेष भरून पाणीपातळी भर वैशाखात अर्थात मे महिन्यातही पुरेशी राहिली. अनेक कुपनलिकांना पाणी येत राहिले. हे सगळे अघटीत घडल्यामुळे टँकर लॉबीचे रास्त उत्पन्न किती कमी झाले हे दुःख सामान्य शेतकऱ्यांना आहे काय? टँकर बंद असल्यामुळे खऱ्या आणि काल्पनिक फेऱ्या बंद झाल्या. कितीतरी पैसा चलनावलनाऐवजी अखर्चित राहून गेला. अनेक थोर अधिकाऱ्यांचे परखर्चाने थंड हवेच्या ठिकाणी जाणे राहून गेले. जे घडले ते बरोबर नाही. इकडे नेहमीप्रमाणे आपल्या शेतकऱ्याला चिंता आहे ती केळीला योग्य भाव मिळतो की नाही याची. शेतकऱ्यांना तर शाश्वत दुःख प्रत्येक पिकात ठेवलेले आहेच. हे का आहे याची माहिती आम्ही पूर्वीच्या कीर्तनात दिलेली आहेच. हा अकुशल कलेचा जीवनोद्योग आहे. हे सर्व सोडा सहकारी तत्त्वावर काल्पनिक शेतीउद्योग आता कागदावर करा. कर्जास सज्ज असे आम्ही आहोत. ते घ्या. मजा करा. तथास्तू!

**- शे.भ.प. 'थंडा' महाराज देगलूरकर**
**मु. पो.** thandamaharaj@gmail.com

# साखर निर्यात विरोधी केंद्रीय मंत्र्याचा पुतळा जाळला

## साखर निर्यातीसाठी शेतकरी संघटना आक्रमक



**शेतकरी संघटनेतर्फे साखर निर्यातीला विरोध करणाऱ्या केंद्रीय अन्नमंत्री थॉमस आणि अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांच्या प्रतिकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. यावेळी जयपाल अण्णा फराटे, संजय कोले, शीतल राजोबा आणि शेतकरी संघटनेचे असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.**



**शीतल राजोबा** (सांगली) : यंदा देशात साखरेचे बंपर उत्पादन झाले असून, देशांतर्गत खपाच्या म्हणजे २२५ लाख टन साखरेपेक्षा ७५ लाख टन साखर जादा तयार होईल. तसेच गतवर्षीची ४० लाख टन साखर शिल्लक आहे. ती आयात केली होती. मागणी व खपापेक्षा जास्त साखर उत्पादन होणार हे पाहून शेतकरी संघटनेने यंदाच्या गळीत हंगामाच्या सुरुवातीसच ५० ते ६० लाख टन साखर निर्यात करावी अशी मागणी करीत उसाचा भाव मागितला. त्यावेळी अन्य संघटना एफआरपीचा विषय चघळीत राहिल्या. जो मुद्दा गौण राहिला.

पहिल्या १० लाख टन साखर निर्यातीनंतर जानेवारी २०११ मध्ये साखर निर्यातीबाबत पुढची घोषणा करण्यात आली; परंतु केंद्रीय अन्नमंत्री के. व्ही. थॉमस व अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी साखर निर्यातीला विरोध दर्शवला. त्यामुळे आजअखेर साखर निर्यात होऊ शकली नाही. परिणामी देशातील साखरेचे भाव डिसेंबर २०१० च्या तुलनेत क्विंटलला ३५० रुपयांनी घसरले. त्यामुळे साखर कारखाने अडचणीत आले. शेतकरीही आले. अ.नगर, पुणे, लातूर, जालना, बीड, उस्मानाबाद, सोलापूर इत्यादी जिल्ह्यांतील अनेक साखर कारखान्यांनी चालू हंगामातील उसाचा ॲडव्हान्स टनाला रुपये १५०० ते १५५० इतकाच दिला. साखर निर्यात होऊ न देण्यामागे आसाम, प. बंगाल, तामिळनाडू, केरळ, पाँडेचेरीतील विधानसभा निवडणुका हे कारण होते. दरम्यान दिनांक १० मे रोजी सांगली येथे शेतकरी संघटनेने केंद्रीय मंत्री थॉमस व मुखर्जींचे पुतळे जाळले. साखर निर्यात रोखून, शेतकऱ्यांचे नुकसान करून निवडणुका जिंकणाऱ्या काँग्रेसच्या राजकारणाच्या धिक्काराच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या. यावेळी शेतकरी संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र विभाग प्रमुख संजय कोले, जयपालअण्णा फराटे, नवनाथ पोळ, आलम जमादार, एम. के. माळी, अण्णासो कुरणे, चंद्रकांत वंजाळे, एकनाथ कापसे, तृशांत मगदूम, गुंडा माळी, रामचंद्र कणसे इत्यादी कार्यकर्ते उपस्थित होते.

परिणामी दिनांक १७ मे रोजी अन्नमंत्री थॉमस यांनी घोषणा केली की सव्वा लाख टन साखर निर्यात करीत आहेत. पहिल्या टप्प्यात एकूण ५ लाख टन साखर निर्यात करू असे अर्थमंत्री प्रणव मुखर्जी यांनी सांगितले. शेतकरी संघटना नेहमीच भविष्यकालीन परिस्थितीचा अचूक अंदाज घेऊन आंदोलन करीत आली आहे.

# साखरेवरील निर्यातबंदी उठली



अखेर केंद्रसरकारने साखरेवरील निर्यातबंदी उठविली असून सुरुवातीला मान्यता मिळालेल्या एकूण ५ लाख टन साखरेपैकी १.५५ लाख टन साखर निर्यात केली जाणार आहे.

साखर कारखाने अन्न मंत्रालयाच्या परवानगीशिवाय साखर निर्यात करू शकत नाहीत. २२ मार्च रोजी प्रणव मुखर्जी आणि अन्न मंत्रालय यांनी साखर कारखान्यांना ५ लाख टन साखरेच्या निर्यातीची खुल्या परवाना अंतर्गत की ज्यात कुठलेही बंधन नसते परवानगी दिली. हा निर्णय दि. १९ एप्रिल रोजी समोर आला. एकूण ५ लाख टन साखरेपैकी ५१,५०० टन साखर शेजारील देशांसाठी राखीव, तर उरलेली साखर ही निर्यातीसाठी साखर कारखान्यांदरम्यान त्यांच्या गत तीन वर्षांच्या सरासरी उत्पादकतेनुसार खुली राहणार आहे.

अन्नमंत्रालयाने १,५५,८१६ टन साखर १५५ कारखान्यांकरिता निर्यातीसाठी खुली करण्याचे आदेश दिले आहेत. फक्त पाच कारखान्यांना त्यांच्या करार आणि अर्जातील त्रुटींमुळे निर्यात नाकरण्यात आली.

# शेतकरी संघटनेचा आदिनाथ कारखान्यावर मोर्चा

करमाळा : ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नासंबंधी शेतकरी संघटनेच्या युवा आघाडीचे अध्यक्ष परमेश्वर तळेकर यांच्या नेतृत्वाखाली आदिनाथ कारखान्यावर मोटारसायकल रॅलीद्वारे शेकडो कार्यकर्त्यांनी मोर्चा नेला.

कार्यकारी संचालक शाहुराजे धाबेकर, नायब तहसीलदार मोहन शिर्के यांना शेतकरी संघटनेच्यावतीने तळेकर, तालुकाध्यक्ष शिवाजी तळेकर, गणेश पवार, हनुमंत यादव, नागनाथ केकान, कल्याण रोकडे, सोमा पारखे, संतोष तळेकर, नवनाथ तळेकर, कल्याण शिनगारे आदी कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत निवेदन देण्यात आले.

यावेळी निवेदनातील विविध मागण्यांवर संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय घेऊ व झालेला निर्णय लेखी स्वरुपात शेतकरी संघटनेला कळविला जाईल, असे आश्वासन कार्यकारी संचालक धाबेकर यांनी मोर्चेकऱ्यांना दिले.

मोर्चेकऱ्यांनी यावेळी जोरदार घोषणा दिल्या. त्यांनी दिलेल्या निवेदनात कार्यक्रमाप्रमाणे ऊसतोडणी करावी, ऊस बिल हप्ता एकरकमी १८०० रुपये प्रति टन द्यावा, नोंदीचा ऊस आदी नंतर बिगर नोंद ऊस गाळावा, गतवर्षी बाहेर गाळलेला ऊस यावर्षी आदिनाथमध्ये गाळला जात आहे याची चौकशी करावी, सध्या चालू असलेल्या शेतकऱ्यांवरील अन्यायाची चौकशी व्हावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. यावर तातडीने कारवाई न झाल्यास चेअरमन व कार्यकारी संचालकांना घेराव घालण्यात येईल, असा इशारा आंदोलकांनी दिला आहे.

यावेळी परमेश्वर तळेकर, नागनाथ केकान, शिवाजी तळेकर, गणेश पवार यांनी मनोगत व्यक्त केले. चालू हंगामात शिल्लक उसाला आपण न्याय मिळवून देऊ व नुकसान भरपाईसाठी प्रयत्न करणार असल्याचे परमेश्वर तळेकर यांनी यावेळी सांगितले.

# वीजजोडणीसाठी उपोषणानंतर मागण्या मान्य

करमाळा : विद्युत रोहीत्र तसेच शेतीपंप वीजजोडणी आदींसाठी शेतकरी संघटना युवा आघाडीने सुरू केलेले आमरण उपोषण मागण्यामान्य झाल्याने मंगळवारी दुपारी मागे घेण्यात आले.

जेऊर उपविभागाअंतर्गत अतिरिक्त विद्युत रोहीत्र उभारणी, शेतीपंपांची वीजजोडणी तसेच रखडलेली इतर कामे तत्काळ मार्गी लावण्याची मागणी करत शेतकरी संघटनेच्या युवा आघाडीने संघटनेचे पश्चिम महाराष्ट्र युवा आघाडी अध्यक्ष परमेश्वर तळेकर यांच्या नेतृत्वाखाली आमरण उपोषणास सोमवारपासून सुरुवात केली होती.

जेऊर वीज मंडळ कार्यालयाच्या प्रवेशद्वारावर सुरू केलेल्या या उपोषण आंदोलनात सचिव गणेश पवार, कल्याण शिनगारे, उपाध्यक्ष लक्ष्मण कदम, शिवाजी तळेकर, हनुमंत यादव, मुबारक शेख, धनंजय शेंडगे, दादासो पवार, अंकुश सुरवसे, साहेबराव तळेकर, विठ्ठल सुरवसे सहभागी झाले होते. शेतकरी संघटना युवा आघाडीने पुकारलेल्या आमरण उपोषणाची दखल घेऊन वीज मंडळाचे बार्शी विभागाचे अभियंता साळवी यांनी उपोषणस्थळी भेट देऊन सर्व मागण्या मान्य करून रखडलेली कामे तात्काळ पूर्ण करण्याची हमी दिली. तशा सूचनाही वीज अधिकारी व कर्मचाऱ्यांना दिल्या. त्यामुळे उपोषण मागे घेण्यात आले.

या आंदोलनात नितीन देशमुख, रामलिंग वैद्य, संदीप यादव, संतोष हौसारे, प्रकाश वैद्य, भगवान थोरात, हनुमंत शिंदे, चांगदेव दरगुडे, ज्योतीराम टकले, शिवाजी कोपनर, उत्तरेश्वर शिंदे, देवीदास तळेकर, रजाक मुलाणी, साहेबराव शिंदे, शरद दोंड, रामचंद्र कदम, अभिमान तळेकर यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी सहभाग घेतला.

# शेतकरी संघटक स्थिर निधी



श्री. त्र्यंबक चव्हाणके



डॉ. आर. टी. जाधव

| | |
|---|---|
| श्री. त्र्यंबक आबाजी चव्हाणके | रु. १००० |
| डॉ. आर. टी. जाधव | रु. १००० |
| यापूर्वी जमा निधी | रु. ५०,००० |
| स्थिर निधी एकूण रक्कम = | रु. ५२,००० |

सर्व देणगीदारांचे मन:पूर्वक आभार.
स्थिर निधीसाठी जास्तीत जास्त साहाय्य करावे असे आवाहन करण्यात येत आहे.
**-कार्यकारी संपादक**